


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




## थोडक्यात...



### बार, वाईन शॉपची वेळ वाढवली?

मुंबई (समर्थ गांवकरी) : सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नववर्षांचे स्वागत करण्यासाठी 31 डिसेंबरची रात्र अविस्मरणीय असते. त्यानिमित्ताने खास पार्ट्यांचे आयोजन केले जाते. नववर्ष स्वागताच्या आनंदात बाधा नको, म्हणून राज्याच्या गृह विभागाने 31 डिसेंबरच्या रात्री पहाटे 1 वाजेपर्यंत मद्यविक्रीला आणि बार, क्लबमध्ये पहाटे पाच वाजेपर्यंत मद्यसेवनास परवानगी दिली आहे.

### महिला मॅनेजरवर धावत्या कारमध्ये सामूहिक बलात्कार

उदयपूर (समर्थ गांवकरी) : उदयपूर पोलिसांनी एका खासगी कंपनीच्या तीन कर्मचाऱ्यांना सामूहिक बलात्कार प्रकरणात अटक केली आहे. कारमध्ये या तिघांनी एका महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप आहे. अटक करण्यात आलेल्या तिघांपैकी एक कंपनीचा सीईओ आहे. ज्या महिलेवर सामूहिक बलात्कार झाला ती महिला कंपनीची कार्यकारी प्रमुख होती. चालत्या कारमध्ये तिच्यावर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे.

### उमेदवारी अनिश्चित मात्र इच्छुकांची अर्ज खरेदी जोरात

वसई (समर्थ गांवकरी) : वसई विरार महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात जागा वाटप व उमेदवारी निश्चितीबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झाली नाही. त्यापूर्वीच इच्छुक उमेदवारांनी अर्ज घेण्यास सुरुवात केली आहे. दोन दिवसात नऊ प्रभागात 1 हजार 277 इतके अर्ज खरेदी करण्यात आले असल्याचे समोर आले आहे.

## दिल्लीतील नाताळच्या प्रार्थना सभेला मोदींची उपस्थिती



नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी दिल्लीतील कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशन येथे नाताळ प्रार्थना सभेला उपस्थिती लावली. दिल्ली आणि उत्तर भारतातील मोठ्या संख्येने ख्रिश्चन भाविक या समारोहाला उपस्थित होते. या सभेत प्रार्थना, कॅरोल, भजन आणि दिल्लीचे बिशप राइट रेव्हरंड डॉ. पॉल स्वरूप यांनी पंतप्रधानांसाठी केलेली विशेष प्रार्थना यांचा समावेश होता. 'दिल्लीतील कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशन येथे नाताळच्या सकाळच्या सेवेत भाग घेतला. या सेवेने प्रेम, शांती आणि करुणेचा शाश्वत संदेश प्रतिबिंबित केला. नाताळची भावना आपल्या समाजात सुसंवाद आणि सद्भावना निर्माण करो. सर्वांना शांती, करुणा आणि आशेने भरलेल्या नाताळच्या शुभेच्छा. येशू ख्रिस्ताच्या शिकवणी आपल्या समाजात सुसंवाद मजबूत करोत', असे पंतप्रधानांनी 'एक्स' या समाजमाध्यमावर नमूद केले. यापूर्वी, पंतप्रधानांनी नागरिकांना नाताळच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनीही जनतेला नाताळच्या शुभेच्छा दिल्या. गेल्या काही वर्षांपासून, पंतप्रधान मोदी नियमितपणे ख्रिश्चन समुदायाशी संबंधित कार्यक्रमांमध्ये सहभागी होत आहेत.

यापूर्वी २०२३ मध्ये ईस्टर दरम्यान, त्यांनी दिल्लीतील सेक्रेड हार्ट कॅथेड्रल येथे एका कार्यक्रमात भाग घेतला. तसेच २०२३ मध्ये ख्रिसमसच्या वेळी, त्यांनी दिल्लीतील ७, लोक कल्याण मार्ग येथील त्यांच्या निवासस्थानी एक कार्यक्रम आयोजित केला. तर २०२४ मध्ये, त्यांनी मंत्री जॉर्ज कुरियन यांच्या निवासस्थानी एका रात्रीच्या जेवणाला उपस्थिती लावली आणि कॅथोलिक बिशप कॉन्फरन्स ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या कार्यक्रमातही भाग घेतला.

# नेतृत्वाला आव्हान

## घराणेशाहीविरोधात ठाण्यात मीनाक्षी शिंदेंचा नाराजीनामा; महाजनांविरोधात फरांदे आक्रमक

ठाणे/नाशिक : (समर्थ गांवकरी)

उमेदवारीत घराणेशाही तसेच बाहेरून येणाऱ्यांना पक्षात घेताना विश्वासात घेतले नसल्याने ठाणे आणि नाशिकमध्ये महिला नेत्यांनी गुरुवारी नेतृत्वालाच आव्हान दिले. ठाण्यातील मानपाडा आणि बाळकुम पट्ट्यात एकाच कुटुंबातील चार ते पाच जणांना उमेदवारी देण्यावरून उघडपणे भूमिका मांडणाऱ्या शाखाप्रमुखाला निलंबित केल्याने झालेल्या शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या महिला जिल्हाप्रमुख मीनाक्षी शिंदे यांनी पदाचा राजीनामा देऊन एक प्रकारे उपमुख्यमंत्र्यांनाच आव्हान दिले.

नाशिकमध्ये ठाकरे गटाचे माजी महापौर विनायक पांडे आणि यतीन वाघ तसेच काँग्रेसचे नेते शाहू खैरे यांचा भाजपप्रवेश पक्षाचे संकटमोचक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गिरीश महाजन यांनी घडवून आणला. याबाबत स्थानिक आमदारांशी चर्चा केली गेली नाही म्हणून भाजपच्या ज्येष्ठ नेत्या व नाशिक मध्यच्या आमदार देवयानी फरांदे यांनी नाराजी व्यक्त केली. विशेष म्हणजे या नेत्यांच्या पक्षप्रवेशावेळी घोषणाबाजी करण्यात आली.



ठाण्यात प्रभाग क्रमांक ३ मध्ये मानपाडा, मनोरमानगर, आझादनगर हा परिसर येतो. येथून माजी महापौर मीनाक्षी शिंदे या निवडून येतात. याच प्रभागातून ज्येष्ठ नगरसेवक संजय भोईर यांचे बंधू भूषण हे गेल्या वेळी निवडून आले. शेजारच्या बाळकुम प्रभागातून संजय भोईर, त्यांची पत्नी उषा आणि त्यांचे वडील देवराम हे निवडून येतात. भोईर कुटुंबीय आणि मीनाक्षी शिंदे यांच्यात मतभेद असल्याची बाब अनेकदा समोर आली आहे. यातूनच भोईर यांच्या जागी स्थानिक पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांला संधी देण्याची मागणी मीनाक्षी शिंदे यांच्या समर्थकांकडून होत आहे. याबाबत काही दिवसांपूर्वी त्यांचे समर्थक असलेले शाखाप्रमुख विक्रांत वायचळ यांनीही उघडपणे भूमिका मांडली होती. यामुळेच पक्षविरोधी कार्य केल्याचा ठपका ठेवत शिवसेना (शिंदे गट) पक्षाचे सचिव संजय मोरे यांनी वायचळ यांना शाखाप्रमुख पदावरून हटवले. यातून शिंदे नाराज होत्या. यामुळे त्यांनी पदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दिला. हा पक्षांतर्गत वाद असून, यातून श्रेष्ठी मार्ग काढतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

विरोधी पक्षातील नेत्यांना प्रवेश दिल्यावरून उडालेल्या वादा भाजपचे संकटमोचक म्हणून ओळखले जाणारे जलसंपदा तथा कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्या कार्यशैलीविरोधात जाहीर भूमिका घेणाऱ्या नाशिक मध्यच्या भाजप आमदार तथा पक्षाच्या महापालिका निवडणूक प्रमुख देवयानी फरांदे यांचा आक्रमकपणा पुन्हा समोर आला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, पालिका निवडणूक प्रमुख म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी असतानाही या प्रवेशाविषयी त्या अनभिज्ञ होत्या. याबाबत कुणी चर्चा केली नसल्याचे त्यांनी नमूद केले. नाशिक मध्यच्या सलग तिसऱ्यांदा प्रतिनिधित्व करणाऱ्या फरांदे या ४० वर्षांपासून राजकारणात आहेत. फरांदे कुटुंबाला राजकीय वारसा आहे.

> निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त करणे हा कोणताही गुन्हा नाही. स्थानिक उमेदवार असावा ही मागणी योग्यच आहे. कार्यकर्त्यांच्या मागे ठामपणे उभी राहणार आहे.
>
> **– मीनाक्षी शिंदे, माजी महापौर, ठाणे**

त्यांचे सासरे प्रा. ना. स. फरांदे यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष भूषवले तसेच विधान परिषदेचे ते सभापती होते. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीवेळी प्रा. देवयानी फरांदे यांना डावलण्याचा प्रयत्न झाले होता.

शहरातील अन्य जागांवरील भाजपचे उमेदवार जाहीर होऊनही त्यांना मात्र उमेदवारीसाठी तिष्ठत रहावे लागले होते. आमदार फरांदे या मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात प्राध्यापिका होत्या. १९९७ पासून सलग तीनवेळा म्हणजे २०१४ पर्यंत त्या नगरसेविका होत्या.

# पुण्यात मध्यरात्री खलबतं!

## रोहित पवार, अमोल कोल्हे अचानक अजितदादांच्या भेटीला, तासाभर गुप्त बैठक

पिंपरी-चिंचवड : (समर्थ गांवकरी)

पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या अनुषंगाने थेट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांशी शरद पवारांच्या पक्षाचे नेते आणि खासदार अमोल कोल्हे आणि आमदार रोहित पवारांची गुप्त बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीत जागावाटप, काही जागांवर निर्माण झालेला तिढा कसा सोडवायचा, उमेदवार कोणत्या चिन्हावरती लढवायचे याबाबच चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. शरद पवारांच्या पक्षाने अमोल कोल्हे आणि रोहित पवारांवर पिंपरी चिंचवडची जबाबदारी टाकताच, त्यांनी थेट अजित पवारांशी गुप्त बैठक घेतली असल्याची माहिती समोर आली आहे.



पिंपरी चिंचवडमध्ये फक्त दोन्ही राष्ट्रवादी एकत्र गेलो तर किती जागा शरद पवारांच्या वाट्याला येणार आणि मविआसोबत लढायचं तर किती जागा सर्व घटक पक्षांना मिळतील. अजित पवारांच्या गटाचे इच्छुक ज्या जागेवर लढण्यास तयार आहेत, त्यातील काही ठिकाणी शरद पवारांच्या इच्छुकांचा दावा आहे, हा तिढा कसा सोडवायचा? अशा परिस्थितीत चारच्या प्रभागात दोन्ही राष्ट्रवादीचे उमेदवार लढवायचे असतील तर स्वतंत्र चिन्हावर लढवायचे की फक्त घड्याळ चिन्हावर लढायचं? काही प्रभाग फक्त तुतारीच्या चिन्हाचे करता येतील का? अजित पवार गटाचे उमेदवार तुतारीच्या चिन्हावर लढतील का? दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आलेच तर मविआचे घटक पक्ष सोबत घ्यायला हवेत, असं शरद पवार राष्ट्रवादीचा आग्रह आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येताना मविआत फूट पडू नये, या दृष्टीने शरद पवार राष्ट्रवादी पावलं टाकू इच्छिते, मात्र ते अजित पवारांना मान्य होईल का? यावर दोन्ही राष्ट्रवादीचं भवितव्य अवलंबून आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेत दोन्ही राष्ट्रवादीची काल रात्री गुप्त बैठक पार पडली. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे अजित गव्हाणे यांच्यात चर्चा झाली. एक तास झालेल्या बैठकीत जागा वाटपावर बरीच घासाघीस झाली.

अजित पवारांच्या इच्छुक उमेदवारांच्या जागी शरद पवारांच्या इच्छुकांनी ही दावा केला आहे. या ठिकाणी नेमके कोणाचे उमेदवार द्यायचे तसेच महाविकासआघाडीतील घटक पक्षांना सोबत घ्यायचं का? यावर बरीच खलबते रंगली. या बैठकीनंतर अमोल कोल्हे आणि रोहित पवार यांनी नो कमेंट्स म्हणत थेट पुणे गाठलं. आता पुण्यात हे दोघे उपमुख्यमंत्री अजित पवारांशी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या अनुषंगाने संवाद साधणार आहेत. अशी अजित पवार गटाकडून बैठकीत उपस्थित असलेल्या अजित गव्हाणेंनी दिली.




# बांगलादेशमध्ये १७ वर्षांनी तारिक रहमान परत

ढाका : (समर्थ गांवकरी)

'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी'चे (बीएनपी) विद्यमान अध्यक्ष तारिक रहमान (वय ६०) १७ वर्षांनंतर गुरुवारी पुन्हा मायदेशी परतले. त्यांचे मोठे स्वागत करण्यात आले. आगामी मध्यवर्ती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष कार्यकर्त्यांना त्यामुळे अधिक बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. १७ वर्षे ते स्वेच्छेने हद्दपार झाले होते. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालेदा झिया यांचे रहमान हे सुपुत्र आहेत. बांगलादेशच्या आगामी पंतप्रधानपदाचे ते दावेदार मानले जातात. रहमान हे पत्नी झुबैदा आणि मुलगी झैमा यांच्यासह ढाक्यात परतले. 'बीएनपी'चे सरचिटणीस मिर्झा फखरुल इस्लाम आलमगीर आणि पक्षाच्या इतर वरिष्ठ नेत्यांनी त्यांचे विमानतळावर स्वागत केले. या वेळी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. बांगलादेशमध्ये फेब्रुवारी महिन्यात मध्यवर्ती निवडणुका होणार आहेत. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाला निवडणूक लढविण्यापासून बंदी घालण्यात आली आहे. जमात-ए-इस्लामी पक्षाची 'बीएनपी'बरोबर २००१-२००६ या काळात युती होती. मात्र, येत्या निवडणुकीत दोन्ही पक्ष एकमेकांसमोर कट्टर विरोधक म्हणून उभे राहिले आहेत. रहमान यांची आई आजारी असून, तिच्याजवळ राहण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे लंडनवरून ते बांगलादेशमध्ये



परतत आहेत. गेल्या वर्षभरापासून थायलंड आणि कंबोडिया यांच्यातील सीमावादावरून होणाऱ्या संघर्षाने जगाचे लक्ष वेधले आहे. हा वाद थांबण्याचे काही नाव घेत नाही. त्यात आणखी भर म्हणजे या सीमाभागात कंबोडियाने उभारलेल्या भव्य विष्णू मूर्तीला उध्वस्त करण्याचे काम थायलंडकडून करण्यात आले. मूर्ती उध्वस्त करण्याचा व्हिडीओ वायरल झाला असून भारत सरकारनेही या प्रकरणावर कडक शब्दात टीका केली आहे.



# ‘कर्मवीर चषक कबड्डी स्पर्धा’ : अ‍ॅड. नितीन ठाकरे

## प्रो-कबड्डीच्या धर्तीवर नाशिकमध्ये रंगणार थरार



**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संस्थेतर्फे नाशिकमध्ये प्रो कबड्डीच्या धर्तीवर जिल्हास्तरीय ‘कर्मवीर चषक कबड्डी स्पर्धा’ आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धा दि. २६ ते २७ डिसेंबर असे दोन दिवस केटीएचएम महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहेत. शुक्रवार दि.२६ रोजी सकाळी ११ वाजता पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर राहणार आहेत, अशी माहिती मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सदर स्पर्धा १७ वर्षे वयोगटातील मुले व मुलींसाठी नॉक आउट व लिग पद्धतीने व प्रो-कबड्डीच्या नियमांप्रमाणे खेळविल्या जाणार आहेत. दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी केंद्रपातळीवर जिल्हाभरातील एकूण १६ केंद्रांवर तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत एकूण १६ केंद्रांवर प्रत्येकी २६ संघ सहभागी झाले होते. अशा एकूण ४१६ संघांनी (मुले व मुली) म्हणजेच तब्बल ५ हजार खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. सहभाग नोंदवला होता. यापैकी विजय मिळविलेले मुले आणि मुलींचे प्रत्येकी १६ असे ३२ विजयी संघ जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमधील अंगभूत कौशल्यांना वाव मिळणार असून, यातूनच उद्याचे राष्ट्रीय खेळाडू तयार होणार असल्याचा विश्वास सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त केला. पत्रकार परिषदेस मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, चिटणीस दिलीप दळवी, संचालक रमेश पिंगळे, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, शशिकांत मोगल, केटीएचएम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कल्पना आहिरे तसेच सर्व समित्यांचे प्रमुख व क्रिडा संचालक, शिक्षक याप्रसंगी उपस्थित होते.

या स्पर्धेतील प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या मुले आणि मुली अशा दोन्ही संघांना प्रत्येकी ३१ हजार रुपये रोख, कर्मवीर चषक, द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या मुले आणि मुली अशा दोन्ही संघांना प्रत्येकी २१ हजार रुपये रोख, कर्मवीर चषक, तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या मुले आणि मुली अशा दोन्ही संघांना प्रत्येकी ११ हजार रुपये रोख, कर्मवीर चषक अशी पारितोषिके दिली जाणार आहेत. याबरोबरच स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूस मान्यवरांच्या हस्ते ‘बेस्ट प्लेयर अवॉर्ड’ देऊन गौरविण्यात येणार आहे. खेळाडूंना प्रो कबड्डीच्या धर्तीवर क्रमांकानुसार आकर्षक रंगीत गणवेश, शूज असे संपूर्ण किट देणार असून, या सामन्यांचा एक वेगळा थरार क्रीडाप्रेमींना अनुभवायला मिळणार आहे. तसेच, या स्पर्धेचे सोशल मिडियावर लाइव्ह प्रक्षेपण देखील केले जाणार असल्याने क्रीडाप्रेमींना घरबसल्या या स्पर्धांचा आनंद घेता येणार आहे.

# कोतकर गट मैदानात; केडगाव प्रभाग १७ मध्ये प्रचाराची आघाडी

- विरोधक अद्याप गुलदस्त्यात; कोतकर गटाचा घरोघरी प्रचार, केडगावातील वातावरण तापले



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केडगाव परिसरातील राजकीय हालचालींना वेग आला असून, केडगावच्या बालेकिल्ल्यावर वर्चस्व सिद्ध करण्यासाठी कोतकर गट पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. महायुती होणार की नाही, उमेदवारीचे अंतिम गणित कसे असणार, याबाबत पक्षपातळीवर चर्चा सुरू असतानाच कोतकर गटाने कोणतीही प्रतीक्षा न करता आपले उमेदवार निश्चित करून प्रचाराचा धुराळा उडवला आहे. प्रभाग क्रमांक १७ मधील भरत सुभाष कांबळे, महेश पोपटराव सरोदे आणि प्रतिभा ज्ञानेश्वर कोतकर या उमेदवारांच्या प्रचाराचा ‘नारळ फोडून’ प्रचार सुरु करण्यात आला. देवी रोड परिसरातून काढण्यात आलेल्या प्रचार फेरीने संपूर्ण परिसरात निवडणुकीची चाहूल लागल्याचे चित्र दिसून आले.

यावेळी केडगाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून प्रचार रॅली काढण्यात आली.

केडगावमध्ये सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, विरोधी गटाकडून नेमके कोण उमेदवार असणार, हे अद्याप स्पष्ट नसतानाही कोतकर गटाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. आपल्या उमेदवारांचा प्रचार थेट मतदारांच्या दारात नेण्याची रणनीती आखत घरोघरी भेटीगाठी, वैयक्तिक संवाद आणि प्रचार फेऱ्यांद्वारे मतदारांपर्यंत पोहोचण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर महापालिकेसाठी बसपाची तयारी जोरात

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बहुजन समाज पार्टीने (बसपा) स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील सर्व प्रभागांसाठी इच्छुक उमेदवारांची चाचपणी करुन सक्षम उमेदवार उभे केले जाणार आहे. त्यासाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. बसपाच्या वतीने शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता तारकपूर येथील हॉटेल सिंग रेसिडेन्सी येथे उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करण्यात आल्या आहेत. या मुलाखतीस इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. मागील महापालिका निवडणुकीत बहुजन समाज पार्टीचे चार नगरसेवक निवडून आले होते, ही बाब लक्षात घेता यावेळीही योग्य, तळागाळातील जनतेशी जोडलेले आणि पक्षाच्या विचारधारेशी निष्ठावान उमेदवार देऊन त्यांना विजयी करण्याचा पक्षाचा निर्धार आहे, असे बसपाचे महाराष्ट्र राज्य प्रभारी रामचंद्र जाधव यांनी स्पष्ट केले. या मुलाखती स्वतः राज्य प्रभारी रामचंद्र जाधव हे घेणार असून, यावेळी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये जिल्हाध्यक्ष सुरज कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष शाहनवाज शेख, जिल्हा प्रभारी सुनिल ओहळ, भाईचारा कमिटीच्या अध्यक्षा उमा शंकर यादव, जिल्हा महासचिव राजू शिंदे यांच्यासह पक्षाच्या विविध समित्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. महापालिका निवडणुकीत बहुजन समाज पार्टीचा प्रभाव वाढविणे, सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर ठाम भूमिका मांडणे आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न महापालिकेच्या माध्यमातून सोडविणे, या उद्देशाने बसपा निवडणूक रिंगणात उतरत असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

# सुपा टोलनाक्यावर पोलिसांवर हल्ला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

सरकारी कामात अडथळा आणून पोलीस अंमलदारांवर हल्ला केल्याप्रकरणी आरोपीला सहा महिने सक्त मजुरी व पाच हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. जिल्हा न्यायाधीश डॉ. यु. जे. मोरे यांनी भा.दं. वि. कलम ३५३ अन्वये हा निकाल दिला. या प्रकरणी सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. मंगेश दिवाणे व अ‍ॅड. अनिल घोडके यांनी कामकाज पाहिले. विश्वजीत रमेश कासार (वय ३२, रा. वाळकी, ता. अहिल्यानगर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. १५ फेब्रुवारी २०२० रोजी कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वाघ यांना फसवणूकीच्या गुन्ह्यातील पसार संशयित आरोपी पुण्याकडून नगरकडे येत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस अंमलदार प्रमोद लहारे व शाहीद शेख यांना सापळा रचण्याचे आदेश देण्यात आले.






# नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या हस्ते भावनाबेन मोर यांचा सन्मान!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

पदमपर गावातील सुप्रसिद्ध गायिका भावनाबेन मोर यांचा सन्मान श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या हस्ते NKT कार्यालयात संपन्न झाला. भावनाबेन मोर यांनी आपल्या गायनकलेच्या माध्यमातून समाजाची संस्कृती, परंपरा आणि लोकसंगीताला नवी उंची दिली आहे. त्यांच्या प्रतिभा, साधना आणि भक्तीभावनेमुळे पाटीदार समाजाचे नाव अभिमानाने उज्ज्वल झाले आहे. विशेष म्हणजे, त्या आमच्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी असून त्यांच्या यशाचा सर्वांनाच अभिमान आहे. कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने श्री. नानजीभाई ठक्कर यांनी केलेला हा सन्मान अत्यंत प्रेरणादायी असून, समाजातील नव्या व गुणी कलाकारांना पुढे जाण्यासाठी निश्चितच बळ देणारा आहे. भावनाबेन मोर यांना पदवी प्रदान करून गौरविण्यात आले, हे खरोखरच कौतुकास्पद कृत्य आहे. या प्रसंगी मी भावनाबेन मोर यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा देतो तसेच श्री नानजीभाई ठक्कर यांना त्यांच्या या सुंदर सामाजिक उपक्रमाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करतो. या सन्मान समारंभाला महादेवभाई संधा (अध्यक्ष), बाबू रवा वेरत (उपाध्यक्ष), हरखा मावजी चौधरी, मंजी केसा गोठी, रणछोड रावजी बरवडिया, रामजीभाई देवजीभाई पटेल, रामजीभाई पटेल आदी समाजाचे मान्यवर नेते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवीन विश्वस्थ मंडळ तयार करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

- मिलिंद क्षिरसागर कायम विश्वस्त प्रतिनिधी राहणार
- अ‍ॅड. संजय शिवाजी क्षीरसागर यांची दोन दशकांची बेकायदेशीर सत्ता संपुष्टात
- उच्च न्यायालयाने सात रिट याचिका फेटाळून केले शिक्कामोर्तब



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या अहिल्यानगर मध्ये सावेडी येथील प. पू. रामकृष्ण क्षीरसागर महाराज स्थापित श्री दत्त देवस्थान या ट्रस्टचे विश्वस्त मंडळ बेकायदेशीर असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे.

न्यायमुर्ती अरुण पेडणेकर यांनी आपल्या ४५ पानी निकालपत्रात ट्रस्टचे तथाकथित सचिव अ‍ॅड. संजय शिवाजी क्षीरसागर व विश्वस्त म्हणवून घेणारे त्यांचे साथीदार दिनेश पटवर्धन, देवराज काशीकर, तुषार कर्णिक व प्रदीप जोशी यांच्यावर बेकायदेशीर कामकाज करत असल्याचा ठपका ठेवून त्यांनी दाखल केलेल्या एकूण सात रिट याचिका फेटाळून लावल्या. क्षीरसागर महाराज यांनी त्यांच्या घराण्यातील कायम विश्वस्त प्रतिनिधी म्हणून नेमलेले मिलिंद गोविंद क्षीरसागर यांचीच नेमणूक कायदेशीर आहे आणि देवस्थानच्या भक्तगणांमधून इतर विश्वस्त मंडळ निवडण्यात यावे असा स्पष्ट आदेश अहिल्यानगरचे सहाय्यक धर्मादाय आयुक्तांना दिला आहे.

प. पू. रामकृष्ण क्षीरसागर महाराज हे दत्तसंप्रदायातील अधिकारी गुरु होते. अहिल्यानगर येथील सावेडी भागात सुमारे पन्नास वर्षांपूर्वी गुरुकुल पद्धतीने प्राचीन वेद शास्त्रांचे प्रशिक्षण तसेच यज्ञ संस्कृतीचे शास्त्रीय ज्ञान देण्याचे कार्य सुरू केले होते. शंकराचार्यांचे आध्यात्मिक प्रतिनिधी अशी त्यांची ख्याती होती. वेदांतनगर मध्ये आज उभे असलेले भगवान दत्तात्रयांचे भारतातील सर्वात मोठे मंदिर अशी त्याची ख्याती आहे.

गेली सुमारे वीस वर्ष या देवस्थानच्या विश्वस्त निवडीच्या वैधते बाबत न्यायालयीन लढाई सुरू होती. अ‍ॅड. संजय क्षीरसागर यांच्या गटाने आपली प्रस्थापित सत्ता राखण्यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. प. पू. रामकृष्ण क्षीरसागर महाराज यांनी स्वतः नेमलेले त्यांच्या कुटुंबातील कायम विश्वस्त प्रतिनिधी मिलिंद गोविंद क्षीरसागर यांना मनमानी पद्धतीने सन २००३ मध्ये काढून वेळोवेळी बेकायदेशीर विश्वस्त नेमणुका स्वतःच्या मर्जीने करून तसे खोटे बदल अहवाल अ‍ॅड. संजय क्षीरसागर यांनी अहिल्यानगर येथील सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे दाखल केले होते. वेळोवेळी ते फेटाळण्यात आले. मात्र त्यावर २०१० पासून अपिले दाखल करून प्रदीर्घ काळ न्यायालयीन लढाईत गुंतवून आपली सत्ता दोन दशके अबाधित राहील हे अ‍ॅड. संजय क्षीरसागर आणि त्यांच्या गटाने पाहिले.

# चार गुन्हेगार सहा महिन्यांसाठी हद्दपार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी कोतवाली पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. पोलिसांच्या रेकॉर्डवरील गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये सहभाग असलेल्या चौघांचा समावेश असलेल्या गुन्हेगारी टोळीला सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. टोळी प्रमुख सतनामसिंग जितसिंग जुन्नी, टोळी सदस्य सागरसिंग बलबिरसिंग जुन्नी, सोनुसिंग रणजितसिंग जुन्नी व गोपाल राजु नायडु (सर्व रा. संजयनगर, काटवन खंडोबा, अहिल्यानगर) अशी हद्दपार केलेल्या चौघांची नावे आहेत.

# महापालिकेच्या निवडणुकीत प्रथमच एमआयएमची एंट्री

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



महापालिकेच्या निवडणुकीत प्रथमच एमआयएमची एन्ट्री होणार आहे. शहरातील पाच प्रभागांतील २० जागा लढविण्याचा निर्णय एमआयएमने घेतला असून, लवकरच इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

महापालिकेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास मंगळवारपासून सुरुवात झाली आहे. सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. एमआयएमने महापालिका निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी केली आहे. शहरातील प्रभाग क्रमांक ४, ५, १०, ११ आणि १२ मध्ये मस्लीम मतदार आहेत. या प्रभागांमध्ये एमआयएमकडून उमेदवार निवडणूक रिंगणात उतरविले जाणार आहेत.

एमआयएमकडे २६ इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यातून २० उमेदवार दिले जाणार असून, त्यासाठीची तयारी पक्षाने सुरू केली आहे. अहिल्यानगर शहरात गेल्या काही दिवसांपासून जातीय तणाव निर्माण झालेला आहे. कोठला येथे झालेल्या दंगलप्रकरणी मुस्लीम तरुणांविरोधात गुन्हे दाखल झाले होते. दंगलीनंतर खासदार ओसुद्दीन ओवीसी यांची मुकुंदनगरमध्ये सभा झाली होती. त्यावेळी महापालिकेची निवडणूक ताकदीने लढणार असल्याचे ओवीसी यांनी जाहीर केले होते.

प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलिल यांनी महापालिका निवडणुकीत लक्ष घातले आहे. इच्छुकांच्या मुलाखती घेऊन उमेदवार दिले जाणार आहेत.

यापूर्वी या पक्षाने कोणतीही निवडणूक लढविली नव्हती. यावेळी एमआयएम ताकदीने निवडणुकीत उतरणार असून, राज्यातील नेत्यांच्या सभांचेही आयोजन करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# “विकास की विनाश? अरवली नष्ट करण्याचा डाव उघड”

- “अरवली जाईल तर भारताचे पर्यावरण कोसळेल!”
- अरवली पर्वतरांगा : विनाशाच्या उंबरठ्यावरचे भारताचे नैसर्गिक कवच!

**(समर्थ गांवकरी)**

## डॉ. विश्वासराव आरोटे (कळसुबाई शिखरावरून)

अरवली पर्वतरांगा या केवळ दगड-मातीची भौगोलिक रचना नसून भारताच्या पर्यावरणीय समतोलाचे धडधडते हृदय आहेत. जगातील सर्वात प्राचीन पर्वतरांगांपैकी एक असलेल्या या टेकड्या गुजरात ते दिल्लीपर्यंत पसरलेल्या आहेत. हजारो वर्षांपासून वाळवंटीकरणाला रोखणे, पाण्याचे पुनर्भरण, प्रदूषण शोषण आणि जैवविविधतेचे संरक्षण—या सर्व जबाबदाऱ्या अरवली समर्थपणे पेलत आहेत. मात्र गेल्या काही दशकांत वाढलेले खाणकाम, शहरीकरण आणि वादग्रस्त धोरणांमुळे हा निसर्गदत्त ठेवा आज अस्तित्वाच्या लढाईत उभा आहे.

सध्याच्या काळात अरवलीविषयी सरकार आणि न्यायव्यवस्थेची भूमिका संमिश्र दिसते. एकीकडे सरकार ‘अरवली ग्रीन वॉल’ प्रकल्पाद्वारे सुमारे ५ किमी रुंद हिरवा पट्टा उभारून वाळवंटीकरण रोखण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु दुसरीकडे, सर्वोच्च न्यायालयाकडून स्वीकारली गेलेली अरवलीची नवी व्याख्या गंभीर चिंतेचा विषय ठरत आहे.

या नव्या निकषांनुसार, १०० मीटरपेक्षा कमी उंचीच्या टेकड्या ‘अरवली’च्या संरक्षणातून वगळल्या जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वैज्ञानिक व पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, यामुळे अरवलीचा ८०–९०% भाग खाणकाम, बांधकाम आणि रिअल इस्टेटसाठी खुला पडू शकतो. परिणामी राजस्थान आणि हरियाणामध्ये मोठ्या प्रमाणावर जनआंदोलने उभी राहिली असून “Save Aravali” ही मोहीम राष्ट्रीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे.

अरवली वाचवणे का अत्यावश्यक आहे? — वैज्ञानिक दृष्टीकोन:

**१) वाळवंटीकरणाला नैसर्गिक प्रतिबंध:**

अरवली पर्वतरांगा थार वाळवंटासाठी नैसर्गिक भिंतीप्रमाणे उभ्या आहेत. या टेकड्या नष्ट झाल्यास वाळूची वादळे थेट दिल्ली, हरियाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील सुपीक जमिनींवर धडकतील. शेती, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यावर याचे दूरगामी परिणाम होतील.



**२) जलचक्र आणि भूजल पुनर्भरण:**

अरवलीतील खडक सच्छिद्र असल्याने ते पावसाचे पाणी शोषून भूजलपातळी वाढवतात. दिल्ली-एनसीआर आणि राजस्थानातील वाढती पाणीटंचाई पाहता अरवलीचे अस्तित्व टिकवणे हा वैज्ञानिकदृष्ट्या अपरिहार्य उपाय आहे. अनियंत्रित डोंगरफोडीमुळे नैसर्गिक झरे, नाले आणि पाणलोट क्षेत्रे कायमची नष्ट होत आहेत.

**३) प्रदूषणाचे नैसर्गिक फिल्टर (Carbon Sink)**

उत्तर भारतातील झपाट्याने वाढणाऱ्या शहरीकरणामुळे निर्माण होणारे वायू प्रदूषण शोषून घेण्याची क्षमता अरवलीच्या जंगलांमध्ये आहे. दिल्लीसाठी या टेकड्या फुप्फुसांप्रमाणे काम करतात. विविध अभ्यासांनुसार, अरवली नष्ट झाल्यास PM2.5 सारख्या धुलीकणांचे प्रमाण ३०–४०% पर्यंत वाढण्याची शक्यता आहे—जे सार्वजनिक आरोग्यासाठी घातक आहे.

**४) जैवविविधतेचे संरक्षण:**

अरवली ही बिबट्या, पट्टेदार तरस, रानमांजर, तसेच शेकडो पक्षी व वनस्पती प्रजातींचे घर आहे. डोंगरांचे तुकडे केल्याने अधिवास तुटतो, जैवविविधता घटते आणि मानव–वन्यजीव संघर्ष वाढतो—याचा थेट परिणाम ग्रामीण समुदायांच्या सुरक्षिततेवर होतो.

विनाशाचे परिणाम: आज नाही थांबलो तर उद्या काय?
पाणीटंचाई तीव्र होईल; शहरांची जलसुरक्षा धोक्यात येईल.
हवेची गुणवत्ता घसरेल; श्वसनविकार आणि आरोग्यखर्च वाढेल.
वाळवंटीकरणाचा वेग वाढेल; शेती व उपजीविका धोक्यात येतील.
जैवविविधता नष्ट होऊन पर्यावरणीय साखळी तुटेल.

अरवली पर्वतरांगा वाचवणे म्हणजे केवळ टेकड्या वाचवणे नाही—ते पाणी, हवा, अन्न, आरोग्य आणि भविष्यातील पिढ्यांचे जीवनमान वाचवणे आहे. आज घेतलेले निर्णय उद्याच्या भारताचे पर्यावरण ठरवतील. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखत अरवलीचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

## मार्ग पुढचा काय? — धोरणात्मक उपाय

1. १०० मीटर निकषाचा पुनर्विचार करून भूआकृतिक आणि पर्यावरणीय घटकांवर आधारित व्यापक व्याख्या स्वीकारणे.
2. खाणकामावर कडक नियंत्रण आणि पर्यावरणीय नुकसानभरपाईची प्रभावी अंमलबजावणी.
3. अरवली ग्रीन वॉल प्रकल्प स्थानिक जैवविविधतेला प्राधान्य देऊन राबवणे.
4. स्थानिक समुदायांचा सहभाग—वनसंरक्षण, पाणलोट व्यवस्थापन आणि रोजगारनिर्मिती.
5. स्वतंत्र वैज्ञानिक मूल्यांकन व पारदर्शक डेटा सार्वजनिक करणे.

# श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेत शंकरपट स्पर्धेचा थरार

## ३८ बैलजोड्यांचा सहभाग

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**




दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेनिमित्त आज पारंपरिक शंकरपट (बैलजोडी बैलगाडी शर्यत) स्पर्धा उत्साहात पार पडली. नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यातील विविध भागांतून आलेल्या एकूण ३८ बैलजोड्यांनी या स्पर्धेत सहभाग घेत माळेगावच्या माळरानावर प्रचंड थरार निर्माण केला. स्पर्धा पाहण्यासाठी भाविक व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

या शंकरपट स्पर्धेचे उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच प्रतिनिधी हनमंत धुळगंडे, पशुसंवर्धन विभागाचे सह आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, गट विकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, उपअभियंता राठोड, दिनेश महेर, चंद्रकांत जाधव, संजय नीलपत्रेवार, आईलाने, चव्हाण, नायब तहसीलदार मेकाले आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेदरम्यान वेगवान, शिस्तबद्ध आणि ताकदवान बैलजोड्यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीने प्रेक्षकांची मने जिंकली. प्रत्येक फेरीदरम्यान टाळ्यांचा कडकडाट, शिट्ट्या आणि जल्लोषात प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामीण परंपरेचा वारसा जपत आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा शेतकरी जीवनशैलीचे जिवंत दर्शन घडविणारी ठरली.

या स्पर्धेत कोंडीबा मोहन कोरडे यांच्या बैलजोडीने प्रथम क्रमांक पटकावला. अवघ्या ४ सेकंद ३९ पॉईंटमध्ये त्यांनी शर्यत पूर्ण करत बाजी मारली. अमोल देविदास राठोड यांनी ४ सेकंद ४२ पॉईंटमध्ये धाव घेत द्वितीय क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अश्विनी दिलीपराव मंदाडे आणि बालाजी माणिकराव कदम यांना विभागून देण्यात आले. या दोन्ही बैलजोडींनी ४ सेकंद ४३ पॉईंटमध्ये शर्यत पूर्ण केली.

प्रथम क्रमांकास ६१ हजार ५१ रुपये, द्वितीय क्रमांकास ५१ हजार रुपये व तृतीय क्रमांकास ४१ हजार रुपये रोख, प्रमाणपत्रासह पारितोषिके उप मुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी सर्व सहभागी बैलजोडी मालकांना प्रोत्साहनपर मानधन देण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शंकरपटसारख्या पारंपरिक क्रीडा प्रकारांमुळे ग्रामीण संस्कृती जिवंत राहते.

शेतकरी आणि बैलगाडीप्रेमींसाठी ही स्पर्धा केवळ मनोरंजन नसून परंपरा, मेहनत आणि निसर्गाशी असलेल्या नात्याचा उत्सव असल्याचे मत प्रवीण पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केले.

### बैलगाडी शर्यतीचे निकाल (वेळ- सेकंद/पॉईंट)

कोंडीबा कोरडे - ४.३९
अमोल राठोड -४.४२
अश्विनी मंदाडे- ४.४३
बालाजी कदम- ४.४३
प्रदीप सानप- ४.५५
प्रतीक दळवी -४.६१
भगवान जाधव -४.६१
संदीप कल्याणकर - ४.६१

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील उड्डाण पुलाचे काम संथ गतीने, वाहन धारकासह नागरीक त्रस्त

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**



नागपूर नांदेड लातूर येडशी महामार्गावर असलेल्या सिडको परिसर लगत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातुर फाटा येथील होत असलेला महामार्ग उड्डाण पुलाचे काम संथ गतीने चालू असल्याने नवीन नांदेड भागातील दैनंदिन ये जा करणाऱ्या हजारो वाहनधारकासह शैकडौ नागरीकांना या पुलाच्या कामामुळे एक किलोमीटर फेरफटका मारून मार्गस्थ व्हावे लागत असल्याने संथ गतीने असलेले काम तात्काळ करून हा मार्ग लवकरच खुला करावा अशी मागणी वाहनधारक सह नागरीकांतुन होत आहे. नवीन नांदेड भागातील सिडको परिसरा लगत डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील उड्डाण पुलाचे काम सुरू असून बाजूने तात्पुरती दुचाकी वाहनांसाठी वाहतूक करण्यासाठी रस्ता करण्यात आला होता परंतु व काही दिवसात हा रस्ता कामासाठी पुन्हा बंद करण्यात आल्या मुळे धारकांना असर्जन चौक उड्डाणपूल मार्गे व दुध डेअरी वसरणी मार्गे नांदेड शहरात जावे लागत असल्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने व त्यातला त्यात उड्डाणपुलाचे काम संथ गतीने होत असल्याने पुलाच्या बाजूने दुचाकी साठी पर्यायी रस्ता मिळेल का व हे काम लवकरात लवकर करण्याची मागणी वाहनधारक व नागरीकांतून होत आहे.

# तीन दिवसाआधी झालेल्या अपघातातील एकाचा मृत्यू

- वजरा येथील शेख फरीद बाबाच्या दर्शनावरून परतताना गोंडवडसा येथील दोन तरुणांचा भीषण अपघात एकाचा मृत्यू एक जखमी
- ट्रॉमा केअर सेंटर असते तर जीव वाचला असता संतप्त प्रतिक्रिया

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



माहूर तालुक्यातील गोंडवडसा येथील दोन तरुण मौजे वझरा येथील शेख फरीद बाबा यांच्या दर्शनासाठी गेले असता दर्शन करून परत येताना त्यांचा दुर्दैवी अपघात झाला या अपघातात आदिल नजीर शेख व २१ वर्ष यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून आमीन नजीर कुरेशी व २१ हे गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत असून ट्रॉमा केअर सेंटर असते तर यांचा जीव वाचला असता ही प्रतिक्रिया जखमीचे नातेवाईक यांनी दिली आहे

गोंडवडसा येथीलआदिल नजीर शेख व आमीन नजीर कुरेशी हे दोघे दुचाकीवरून शेख फरीद बाबाच्या दर्शनासाठी गेले होते दर्शन आटोपून परत येताना एका तीव्र वळणावर अंदाज चुकल्याने त्यांची दुचाकी रस्त्यावरून घसरून भीषण अपघात झाला या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले घटनेची माहिती आयान रोशन कुरेशी यांनी तात्काळ दूरध्वनीद्वारे घरच्यांना दिली माहिती मिळताच कुटुंबीयांनी दोघांनाही त्वरित माहुर येथील रुग्णालयात दाखल केले मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला नागपूर येथील रुग्णालयात आदिल नजीर शेख यांच्यावर आयसीयू मध्ये तीन दिवस उपचार सुरू होते मात्र बुधवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला या घटनेने गोंडवडसा परिसरात शोककळा पसरली आहे दरम्यान आमीन यांच्या वर उपचार सुरू आहेत

अनेक वर्षापासून माहूर येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर बनवावे अशी मागणी होत असून ट्रॉमा केअर सेंटर असते तर त्यांचा जीव वाचला असता अशी संतप्त आणि तीव्र प्रतिक्रिया नागरिकातून व्यक्त होत आहेत.

# नगर तालुक्यात दोन गटात तुफान हाणामारी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर तालुक्यातील राळेगण म्हसोबा शिवारात मंगळवारी (दि. २३ डिसेंबर) रोजी दोन गटात तुफान हाणामारी झाल्याची घटना घडली. यामध्ये दोन्ही गटांचे चार जण जखमी झाले आहेत. याप्रकरणी परस्पर विरोधी फिर्यादींवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत राजाराम विठोबा कारंडे (वय ५६) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हनुमंत कारभारी कारंडे, सचिन हनुमंत कारंडे, सार्थक हनुमंत कारंडे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, मंगळवारी सकाळी संशयित आरोपींनी लाकडी काठी, लोखंडी पाईप व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.

*शिवाजी मामा नाईकवाडी व शुभम गायकर यांच्या वाढदिवसानिमित्त*

# शिंदे वाडी शाळेत डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या कडून विद्यार्थ्यांना स्वेटर, शालेय साहित्य व खाऊचे वाटप!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**





अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदे वाडी येथे सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविणारा स्तुत्य उपक्रम पार पडला. शिवाजी मामा नाईकवाडी व शुभम गायकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी थंडीपासून संरक्षण देणारे स्वेटर, शालेय साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम २४ डिसेंबर रोजी उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. थंडीच्या दिवसांत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उबदार कपड्यांची गरज ओळखून त्यांनी ही सामाजिक मदत केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. स्वेटर व शालेय साहित्य हातात पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व समाधान पाहून उपस्थितांचे मन भारावून गेले. यावेळी शाळेचे शिक्षक युवराज धराडे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका संपर्कप्रमुख तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे वृत्त संपादक संजय गायकर, सौ. दिपाली गायकर, शुभम गायकर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी शाळेच्या उपक्रमशील वाटचालीचे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या अशा सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करण्याचा आदर्श संदेश समाजासमोर ठेवण्यात आला.

# नानजीभाई ठक्कर यांचा गौरवपूर्ण सन्मान!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



समाजाची खरी प्रगती तेव्हाच साध्य होते, जेव्हा समाजात असे व्यक्तिमत्त्व जन्माला येतात, जे केवळ स्वतःपुरते न थांबता संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी आपले जीवन समर्पित करतात. अशाच दुर्मिळ व प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला आहेत.

शिक्षण क्षेत्रात मदत, गरीब व गरजू घटकांसाठी सामाजिक सहकार्य, तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन, तसेच समाजाची संस्कृती व परंपरा जपण्यासाठी त्यांनी निस्वार्थ भावनेने केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. ते केवळ समाजसेवा करत नाहीत, तर सेवेची भावना सतत जिवंत ठेवतात, हे त्यांच्या कार्याचे विशेष वैशिष्ट्य आहे.

आजच्या काळात समाजाला केवळ शब्दांची नव्हे तर प्रत्यक्ष कृतीची गरज आहे. नानजीभाई ठक्कर यांच्यासारखी व्यक्तिमत्त्वे प्रामाणिकपणा, नम्रता आणि समर्पणाच्या जोरावर खरी समाजसेवा कशी करावी, याचे जिवंत उदाहरण ठरतात.

श्री नंदासर लेवुआ पाटीदार फाउंडेशन यांच्या वतीने अशा दानशूर व सेवाभावी व्यक्तीचा सन्मान करण्यात येणे, हे समाजाला सकारात्मक दिशेने प्रेरित करणारे उत्कृष्ट कार्य असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. अशा सन्मानांमुळे तरुण पिढीला नवी प्रेरणा मिळून सेवेची भावना अधिक बळकट होते. नानजीभाई ठक्कर यांच्या अथक सामाजिक कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व देव त्यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य व समाजसेवा करत राहण्यासाठी अधिक शक्ती देवो, अशी प्रार्थना व्यक्त केली.


या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महादेवभाई संधा होते. यावेळी उपाध्यक्ष बाबू रवा वेराट, हरखा मावजी चौधरी, सर्वश्री सुरेशभाई ठक्कर, मंजी केसा गोठी, रणछोड रावजी बरवडिया, रामजीभाई देवजीभाई पटेल, रामजीभाई पटेल तसेच समाजातील अनेक मान्यवर व समुदाय नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महामार्गावरील वाहतुकीत मोठे बदल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हयातील लोणीकंद पोलीस ठाणे हद्दीत मौजे पेरणे, ता. हवेली, जि. पुणे येथे दि. ०१/०१/२०२६ रोजी जयस्तंभकार्यक्रम होणार असुन सदर जयस्तंभ पेरणे यथे मानवंदना देणेकरीता मोठ्या प्रमाणात नागरीकांची गर्दी होणार आहे. जयस्तंभ पेरणे येथे मानवंदना दिल्यानंतर त्यातील लाखोंच्या संख्येने लोक मौजे वढु बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळी भेट देवुन समाधीचे दर्शन घेत असतात. जयस्तंभ पेरणे येथील कार्यक्रम अहिल्यानगर पुणे महामार्गालगत असुन कार्यक्रमाकरीता येणारे नागरीकांमुळे सदर महामार्गावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होवुन मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# दै. समर्थ गांवकरी इम्पॅक्ट अखेर ठाणे महानगर पालिका प्रशासनाकडून दिवा स्टेशन जवळील तलाव स्वच्छ करण्यास सुरुवात...






महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
गांवकरी
www.sgavkari.com
22 Dec 2025 - Page 2

## दिवा स्टेशन जवळील तलाव तातडीने स्वच्छ करण्याची भाजपची मागणी

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

दिवा स्टेशन जवळील तलाव तातडीने स्वच्छ करण्याची दिवा भाजपने मागणी केली आहे. दिवा शहरातील स्टेशन परिसरात असलेला एकमेव तलाव सध्या अत्यंत घाणेरड्या व दुर्लक्षित अवस्थेत असून तलावांचे शहर म्हणून ठाण्याची ओळख असलेल्यापैकी दिवा रेल्वे स्थानक पूर्वेकडील सदर तलावामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा, प्लास्टिक, सांडपाणी तसेच जलकुंभ (हायसिंथ) साचलेले असून त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. तलावाची ही अवस्था आरोग्याच्या दृष्टीने अतिशय धोकादायक असून मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तरी सदर तलावाची तातडीने स्वच्छता करून कचरा व जलकुंभ काढण्यात यावा, तसेच भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी योग्य ती नियमित देखभाल व्यवस्था करण्यात यावी व या गंभीर विषयाची तातडीने दखल घ्यावी असे निवेदनाद्वारे दिवा भाजप मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांना केली आहे.

# सिन्नर नगरपालिकेत वैदु समाजाच्या रणरागिणीचा दणदणीत विजय

## उ.बा.ठा. शिवसेनेच्या सौ. अंबिका धनगर यांची नगरसेवकपदी ऐतिहासिक निवड!

**(समर्थ गांवकरी)**

**डॉ. विश्वासराव आरोटे (कळसुबाई शिखरावरून)**



"बोले तैसा चाले त्याची वंदावे पाऊले" या म्हणीप्रमाणे राज्याच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात सिन्नर नगरपालिकेच्या चुरशीच्या निवडणुकीत वैदु समाजाच्या रणरागिणी सौ. अंबिका धनगर यांनी दणदणीत विजय मिळवत नवा राजकीय इतिहास घडवला आहे. उबाठा शिवसेना गटाच्या उमेदवार म्हणून त्यांनी भरघोस मतांनी नगरसेवकपद पटकावले असून, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या सामाजिक व राजकीय संघर्षाला यशस्वी पूर्णविराम दिला आहे.

ही निवडणूक केवळ एका नगरसेवकपदापुरती मर्यादित न राहता सामाजिक न्याय, संघटनशक्ती आणि निष्ठावान कार्याची पावती देणारी ठरली आहे. उबाठा शिवसेनेचे खासदार राजाभाऊ वाजे यांचे कट्टर समर्थक युवा नेते लोकेश धनगर यांच्या त्या सुविद्य पत्नी असून, सासरे तात्या धनगर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी निवडणूक लढवली. "माझ्या विजयाचे खरे शिलेदार खासदार राजाभाऊ वाजे आहेत," असे ठामपणे सांगत सौ. अंबिका धनगर यांनी आपल्या विजयाचे श्रेय पक्षनेतृत्व, कुटुंबीय आणि मतदारांना दिले.

वैदु समाजाच्या योगदानाची राजकीय दखल : महाराष्ट्र राज्यातील वैदु समाजाने पिढ्यानपिढ्या सामाजिक कार्य, जनजागृती आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढा दिला आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये या समाजाने उबाठा शिवसेना व महाविकास आघाडीला दिलेले योगदान लक्षणीय राहिले आहे. या सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी वैदु समाजातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी धनगर परिवाराला उमेदवारी दिली. केंद्रात व राज्यात महायुतीचे सरकार असतानाही सिन्नरमधील या प्रभागात महाविकास आघाडीने मिळवलेले यश हे विशेष उल्लेखनीय ठरले आहे.

"अभि नहीं तो कभी नहीं" – प्रचारातून उभा राहिला विश्वास:

निवडणूक प्रचारादरम्यान सौ. अंबिका धनगर यांनी "विकासाची नवी पहाट" हा प्रभावी नारा देत मतदारांशी थेट संवाद साधला. "अभि नहीं तो कभी नहीं" या निर्धाराने त्यांनी घरोघरी जाऊन प्रचार केला. धनगर परिवाराने आजवर प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपली आहे. युवकांच्या प्रश्नांसाठी नेहमी पुढे असणारे लोकेश धनगर यांच्या नेतृत्वाखाली दमदार एंट्री करत अंबिका धनगर यांनी मतदारांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्वाला मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिला.

विजयानंतरचा निर्धार – विकासालाच प्राधान्य : विजयानंतर बोलताना सौ. अंबिका धनगर म्हणाल्या,

"माझे एकच ध्येय आहे— माझ्या शहराचा आणि माझ्या प्रभागाचा सर्वांगीण विकास. पुढील पाच वर्षांत प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्याचा माझा संकल्प आहे. 'उतरणार नाही, माघार घेणार नाही, दिलेला वसा सोडणार नाही' या भावनेने मी काम करीन. ३६५ दिवस, २४ तास जनतेच्या सेवेसाठी मी तत्पर राहीन. हा विजय माझा एकट्याचा नसून, माझ्यावर विश्वास ठेवून मला अमूल्य मते देणाऱ्या प्रत्येक मतदाराचा आहे."

तसेच, "ज्या विश्वासाने मला उमेदवारी देण्यात आली, त्या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही," असे सांगत त्यांनी खासदार राजाभाऊ वाजे यांचे विशेष आभार मानले.

या ऐतिहासिक विजयाबद्दल उबाठा शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवा नेते आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, तसेच खासदार राजाभाऊ वाजे यांनी अभिनंदन केले आहे.

याशिवाय वैदु समाजाचे मार्गदर्शक दशरथ आटकर, प्रांतिक अध्यक्ष राजू लोखंडे, प्रांतिक कार्याध्यक्ष संजय शिंदे, चंदर बापू दासरजोगी, संगमनेर-नायगाड साहेबराव शिंदे, अकोले माजी ग्रामपंचायत सदस्य रणजित शिंदे.अकोले ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक सुरेश शिंदे, नामवंत उद्योजक चंदर शिंदे . सामाजिक कार्यकर्ते सालच्या लोखंडे. माजी नगरसेवक सुरेश लोखंडे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवक तालुकाध्यक्ष लखन शिंदे.अकोले तालुक्यातील नामांकित उद्योजक गणेश शिंदे.आदी विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### समीकरणांवर परिणाम

सिन्नर नगरपालिकेतील हा विजय केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित न राहता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणावर परिणाम करणारा ठरणार आहे. वैदु समाजाच्या एकजुटीचे आणि उबाठा शिवसेनेच्या संघटनशक्तीचे हे प्रतीक मानले जात असून, सौ. अंबिका धनगर यांचा विजय हा सामाजिक न्याय, निष्ठा आणि विकासाच्या राजकारणाचा ठोस संदेश देणारा असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# नगरमध्ये 15 लाखांची घरफोडी करणारा ठाण्यातून जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील विराज कॉलनी, सावेडी येथे घरफोडी करत १४,७५,०००/- रुपये किमतीचा ऐवज चोरून नेणारा अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ठाणे येथून जेरबंद केला आहे. रफिक मेहबुब शेख (वय-४३ वर्षे, रा. पहिली राबोडी, जुम्मा मस्जिदचे पाठीमागे, बापुजीनगर, राबोडी, ठाणे वेस्ट) असे या आरोपीचे नाव आहे. याबाबत हकिगत अशी की, फिर्यादी अशोककुमार विजयकुमार अग्रवाल (वय-५० रा. बंगला क्र. ०६, विराज कॉलनी, सावेडी, ता. जि. अहिल्यानगर) हे नातेवाईकांकडे बाहेर गावी गेलेले असतांना दि. १३ ते १६ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये अज्ञात चोरट्यांनी फिर्यादीच्या घराचे पाठीमागील दरवाजाचे लॉक तोडुन आत प्रवेश करुन लॉकर व कपाटातील सोने, चांदीचे दागिने, घड्याळ, रोख रक्कम असा एकुण १४,७५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल चोरुन नेलेला आहे.

सदर घटनेबाबत फिर्यादी



यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाणे गु.र.नं. 1191/2025 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 331(3), 331 (4), 305 (a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.



**शिवनेरी :** कुकडी प्रकल्पातील सर्व धरणातील पाणीसाठा सरासरी ९०% शिल्लक आहे . यामुळे चालू वर्षी सर्व शेतकऱ्यांना मे अखेर शेतीला पाणी मिळणार आहे. कुकडी प्रकल्पातील सर्व धरणांमधून नदी व सांडव्याद्वारे आज अखेर पाणी सोडण्यात आलेले नाही आहे. धरणातील पाणीसाठा पुढीलप्रमाणे : येडगाव ९ ८ . ६ % , माणिकडोह ८१. २२ टक्के , वडज ९४ . ७४% , पिंपळगाव जोगे ८९. २१ टक्के , डिंभे ९७. १०% विसापूर , ९५. ६६ % , चिल्हेवाडी ९१. ३४ % , घोड ९५ . ५ ६% असा साठा शिल्लक आहे. डिंभे डावा कालवा १७ . २९ / १३२ .८ ४ व उजवा कालवा १४. ६२ / ९७ .९१ यामधून घोड शाखा येथे पाणी सोडण्यात आलेले आहे.

## थोडक्यात बातम्या...



### हजरत कादरी बाबाचा संदल उत्सहात

रावेर (स. गांवकरी) : रावेर तालुक्यातील खिर्डी खु " येथील हजरत सैय्यद कादरी शाह बाबा यांचा संदल(चादर) उत्साहात साजरा करण्यात आला. संदल उत्सव मध्ये हिन्दू -मुस्लीम एकते चे चित्र दिसून आले. तसेच ढोलताशा च्या गजरात सय्यद कादरी बाबा यांच्या दर्गावर चादर चढविण्यात आली.यावेळी अनेक मान्यवर हजर होते . त्यात प्रामुख्याने , मस्जिद मुत्वल्ली शेख अस्लम, निंभोरा पोलिस स्टेशन चे सहाय्य पोलिस निरीक्षक हरिदास बोचरे,शेख सलमान,शेख शब्बीर, ग्राम पंचायत सदस्य गणेश देवगिरकर, रफीक बेग, इम्रान खाटीक यांच्यासह समाज बांधव व भाविक उपस्थित होते.




### दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंक व वृत्तपत्राचे प्रकाशन!

(स. गांवकरी) : आज दिनांक 25/12/2025 रोजी महादेव जानकर यांच्या हस्ते राष्ट्रीय समाज पक्ष मुख्य कार्यालयात दैनिक समर्थ गांवकरी या वृत्तपत्राच्या दिवाळी विशेषांकाचे तसेच नियमित वृत्तपत्राचे अधिकृत प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी राष्ट्रीय समाज पक्षाचे विविध पदाधिकारी, मान्यवर नेते तसेच पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान दैनिक समर्थ गांवकरीच्या सामाजिक, ग्रामीण व जनहिताशी निगडित पत्रकारितेचे कौतुक करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्यामुळे पक्ष व माध्यम यांच्यातील संवाद अधिक दृढ होऊन, समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सकारात्मक दिशा मिळेल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.



### सर्वोदय विद्या मंदिर कातळापूर येथे केंद्राच्या क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

राजूर (स. गांवकरी) : सर्वोदय विद्या मंदिर कातळापूर येथे केंद्राच्या क्रीडा स्पर्धा दिमाखात संपन्न झाल्या. या स्पर्धेसाठी गटशिक्षणाधिकारी अरवींद कुमावत,सत्यनिकेतन संस्थेचे सचिव एम.एल.मुठे, शिक्षण विस्तार अधिकारी संभाजी झावरे, केंद्र प्रमुख रामदास लांघी यांनी आवर्जून भेट दिली. या केंद्राची क्रीडा समिती, सांस्कृतिक समितीचे, सर्व सदस्य, सर्व तंत्रस्नेही शिक्षक बांधव, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, उपाध्यापक बंधू भगिनी या सर्वांनी मोलाची साथ दिली. आपापल्या परीने योगदान दिले. सांस्कृतिक स्पर्धा रणद बु. शाळेत झाल्या. त्यांनी अत्यंत सुंदर नियोजन केले. त्यांच्या सर्व स्टाफ व ग्रामस्थ यांचे खूप खूप आभार. माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संपत धुमाळ व सर्व स्टाफ यांनी कमी वेळात आपल्याला ग्राउंड उपलब्ध करून दिले. विशेषतः त्यांनी खोखो पोल थेट पुण्याहून मागवले. केंद्र शाळा कातळापूरचे मुख्याध्यापक व सर्व स्टाफ यांनी पाहुण्या मुलांचे व गुरुजणांचे चांगले आदरातिथ्य केले. केंद्रातील शाळा माळेगाव, तेरुंगण, सरोवरवाडी, रणद खु, रणद बु, कोदणी, गुहिरे, भंडारदरा, दऱ्याची वाडी, माध्यमिक शाळा कातळापूर, माध्यमिक शाळा गुहिरे येथील सर्व सन्माननीय मुख्याध्यापक, शिक्षक बंधू भगिनी त्यांचे क्रीडा शिक्षक तसेच शिक्षकेतर स्टाफ, परिसरातील सर्व सरपंच, सदस्य, वरिष्ठ नागरिक, पालक वर्ग तसेच शाळा व्यवस्थापन समिती कातळापूर व केंद्रातील सर्व शाळांच्या व्यवस्थापन समिती, सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच व सदस्य या सर्वांचे खूप खूप आभार मानले आहे.

# चर्च ऑफ ख्राईस्टमध्ये नाताळ सण मोठ्या उत्साहात साजरा

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील चर्च ऑफ ख्राईस्टमध्ये नाताळ सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित विशेष प्रार्थनेत पास्टर इंगळे यांनी उपस्थित भाविकांना येशू ख्रिस्त जन्माचा शुभ संदेश दिला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, प्रभू येशूचा जन्म अखिल मानव जातीच्या उद्धारासाठी आणि पापक्षमेसाठी झाला आहे. परमेश्वराने मानवावर अनमोल प्रीती केली असून, पापा मुळे मानवाचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन व तारण मिळावे, हीच नाताळची खरी शुभ वार्ता आहे. प्रत्येक मानवाच्या अंतःकरणात येशूने जन्म घ्यावा आणि मानवाने आपल्या हृदयातील लहान-मोठे पाप सोडून येशूला हृदयात स्थान द्यावे, जेणेकरून



त्याला पूर्ण शांती व आनंद मिळेल, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या सोहळ्याचे औचित्य साधून माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य मराठी तालुका पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष पत्रकार पीटर रणसिंग यांचा 'समाज भूषण' पुरस्कार देऊन गौरवपूर्ण सन्मान करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा सुनीताताई खेतमाळीस, पोपट आबा खेतमाळीस, नगरसेवक संग्राम घोडके, एम. डी. शिंदे, प्रशांत गोरे, चांदणीताई खेतमाळीस, प्रवीण काळे, प्रहार अपंग संघटनेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पोकळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

नाताळनिमित्त चर्चमध्ये तरुण संघाने 'वॉच नाईट सर्विस' मध्ये सहभागी होऊन ख्रिस्त जन्माची गीते सादर केली, तर संडे स्कूलच्या मुला-मुलींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. माजी मंत्री बबनराव पाचपुते आणि नगराध्यक्षा सुनीताताई खेतमाळीस यांनी समस्त ख्रिस्ती बांधवांना नाताळच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार पीटर रणसिंग यांच्या वतीने माजी मंत्री बबनराव पाचपुते यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

उत्सवासाठी तरुण संघाने चर्चला आकर्षक विद्युत रोषणाई व सजावट केली होती. चर्च महिला मंडळ व युवक संघाने ख्रिस्त जन्मोत्सवाची गीते सादर करून वातावरणात आनंद भरला. कार्यक्रमाचे स्वागत आणि आभार प्रदर्शन चर्च सेक्रेटरी प्रकाश रणसिंग यांनी केले. या प्रसंगी चर्च कमिटीचे सर्व सभासद, पदाधिकारी आणि परिसरातील ख्रिस्ती बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालाजी बामणे यांची नांदेड जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती

**किनवट: (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात असलेल्या ऐतिहासिक किल्ले वाफगाव येथे संपन्न होणाऱ्या श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर प्रथम यांच्या राज्याभिषेक महोत्सवासाठी नांदेड जिल्हा प्रतिनिधी म्हणून किनवट तालुक्यातील सक्रिय सामाजिक कार्यकर्ते व बाजार समितीचे संचालक बालाजी गोविंदराव बामणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर यांच्या स्वाक्षरीच्या अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे करण्यात आली असून, राज्याभिषेक महोत्सवाचे नियोजन अधिक व्यापक आणि प्रभावी व्हावे, या उद्देशाने समितीने राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी प्रतिनिधींची निवड केली आहे.



होळकर घराण्याच्या गौरवशाली परंपरेतील व राज्यातील अत्यंत सन्मानाच्या या ऐतिहासिक सोहळ्यासाठी बालाजी बामणे यांची निवड झाल्याने नांदेड जिल्ह्यात तसेच किनवट तालुक्यात आनंद व्यक्त केला जात आहे. सामाजिक, सहकार व सार्वजनिक जीवनात त्यांचा सक्रिय सहभाग लक्षात घेता ही नियुक्ती योग्य असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# किनवट शहरातील ७ धुरंदर मुस्लिम नेत्यांचा पराभव

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

शहरात नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राजकीय वर्तुळात निकालांची सखोल चिकित्सा सुरू असून, या निवडणुकीतील सर्वात मोठा आणि चर्चेचा मुद्दा ठरला आहे तो म्हणजे शहरातील सात धुरंदर व मातब्बर मुस्लिम नेत्यांचा झालेला पराभव. मागील अनेक दशकांपासून सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या या नेत्यांना यावेळी मतदारांनी स्पष्ट संदेश देत घरचा रस्ता दाखवला आहे. यामध्ये सर्वाधिक चर्चा होत आहे ती माजी नगराध्यक्ष साजिद खान यांच्या पराभवाची. साजिद खान हे सलग तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्यांनी नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष अशी महत्वाची पदे भूषवली असून, गेल्या चार वर्षांपासून ते 2025 च्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे प्रबळ दावेदार म्हणून ओळखले जात होते. मात्र भाजपाच्या अत्यंत चोख राजकीय डावपेचात ते अडकले. परिणामी नगराध्यक्ष पदाची संधी तर हुकलीच, पण प्रभाग क्रमांक 9 मधून निवडणूक लढवताना त्यांना एका ज्येष्ठ महिला उमेदवाराकडून पराभव पत्करावा लागला. या निकालातून शहरातील एका प्रमुख मुस्लिम नेत्याच्या राजकीय भूमिकेला मतदारांनी स्पष्ट विरोध दर्शविल्याचे दिसून येते. तर आता पर्यंत सलग 4 वेळा निवडून कोणीच आलेले नाही असे द्योतक सत्य ठरले आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे माजी सभागृह गटनेते व माजी नगरसेवक जाहिरोद्दीन खान यांनी आपल्या पत्नीच्या माध्यमातून महिला राखीव जागेवर नशीब आजमावले होते. मात्र या ठिकाणी सौ. सरोजिनी ओद्दीवार यांनी त्यांचा पराभव केला. मुस्लिम समाजात अत्यंत लोकप्रिय असलेले जाहिरोद्दीन खान यांचा हा पराभव त्यांच्या पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

याशिवाय हाजी हबीब यांनी प्रभाग क्रमांक 10 मधून अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. 2017 मध्ये थेट नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवून तिसऱ्या क्रमांकाची मते मिळवणारे, तसेच प्रसिद्ध जामा मशिदीचे पदाधिकारी म्हणून ओळख असलेले हाजी हबीब यांनाही यावेळी मतदारांनी नाकारले.

# रिंगरोड म्हणून उजव्या कालव्याचे डांबरीकरण करा

- ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना साकडे
- कालव्यासाठी जास्त घेतलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत द्या

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले शहरासाठी रिंगरोड म्हणून पर्याय असणाऱ्या निळवंडे धरणाचे उजव्या कालव्याचे कळस ते इंदुरी असे डांबरीकरण करण्यात यावे व कालव्यासाठी भूसंपादन केलेल्या जमिनीची मोजणी करून जास्तीची जमीन शेतकऱ्यानंच्या नावावर पुन्हा करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे भाजपची सोशल मीडिया जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे पाटील यांनी केली आहे

जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अकोले तालुक्यातील निळवंडे धरणाचे कालवे अकोले शहराला लगत आहेत. शहरांमध्ये खूप वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. अकोले शहराला रिंग रोडची खूप



अकोले तालुक्याचे भाग्यविधाते मधुकररावजी पिचड यांनी निळवंडे धरणासाठी धरण लाभ क्षेत्रातील आठ एकर पेक्षा चे जास्त क्षेत्र पुनर्वसन साठी राखीव असा शेरा रद्द करून शेतकऱ्यांना पुन्हा दिले आहेत. त्याचप्रमाणे चितळवेढे येथे धरणासाठी संपादित केलेली जमीनही शेतकऱ्यांच्या नावावर पुन्हा करून दिलेले आहे. त्यामुळे नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी क्रांतिकारी निर्णय पिचड साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवून या जमिनी शेतकऱ्यांना पुन्हा मिळून द्याव्यात.

आवश्यकता आहे. परंतु यासाठी भूसंपादन हा मोठा प्रश्न निर्माण होईल. परंतु या कालव्यांमुळे भूसंपादनाचा प्रश्न मिटू शकतो या कालव्यांमुळे अगस्ती सहकारी साखर कारखान्याच्या ऊस वाहतुकीचा ही प्रश्न सुटू शकतो कळस पासून ते इंदुरी पर्यंत या या कालव्यांचे मजबुतीकरण खडीकरण व डांबरीकरण जर केली तर अकोले शहरातील वाहतूक समस्या कमी होईल. निळवंडे धरणाचे कालवे खालच्या बाजूने पाच मीटर म्हणजे १८ फुटाचे असल्यामुळे रस्त्याचा प्रश्न यामुळे सुटणार आहे. कळस, सुगाव, मनोहरपुर वाशेरे, परखतपूर, अगस्ती साखर कारखाना, धुमाळवाडी नवलेवाडी, औरंगपूर, उंचखडक, इंदुरी या गावातील जोडरस्ते या कालव्याला जोडले जातील आणि त्यामुळे त्या गावातीलही वाहतुकीचा प्रश्न सुटू शकतो.

निळवंडे धरण प्रकल्प आता पूर्ण झाला असून या प्रकल्पासाठी जमिनीचे भूसंपादन खूप मोठ्या प्रमाणात झालेले आहे. कालव्यासाठी तिप्पट प्रमाणात भूसंपादन झालेले आहे अकोले तालुक्यामध्ये शेतकरी हे कमी क्षेत्रावाले आहेत त्यामुळे अनेकांच्या शेती कमी झालेले आहेत जमिनी संपादन करताना जुन्या काळामध्ये मोजणी न करता अंदाजे संपादन केलेले आहेत यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी विभागणी झालेली आहे काही जमिनी कालव्याच्या वरून तर काही जमिनी कालव्याच्या खालून असाही परिणाम झालेला आहे तसेच जमिनीचे संपादन करताना मातीचे कालवे असल्याने त्यासाठी जास्त संपादन झालेले आहे.आज कालव्यांचे अस्तरीकरण होणार असून तसेच आता बंद पाइपने पाणी दिले जाणार असल्याने शेतकऱ्यांच्या जादा भूसंपादित केलेल्या जमिनीची मोजणी होऊन विशेष बाब म्हणून या जमिनी शेतकऱ्यांना पुन्हा त्यांच्या नावावर ती करण्यात याव्या अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# सबला उत्कर्ष फाउंडेशनतर्फे प्रबोधनाचा जागर; एकदिवसीय शिबिर उत्साहात संपन्न!

**छत्रपती संभाजीनगर (समर्थ गांवकरी)**

सबला उत्कर्ष फाउंडेशन पडेगाव, छत्रपती संभाजीनगर जिल्हा युनिटच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन, राष्ट्रसंत गाडगेबाबा स्मृतीदिन तसेच स्त्रीमुक्ती दिनानिमित्त एकदिवसीय प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर रांजणगाव येथील लुंबिनी बुद्ध विहार, रांजणगाव शेणपुंजी, छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात पार पडले.

या प्रबोधन शिबिरात आंबेडकरी चळवळीचे गाढे अभ्यासक संदीप तेंडोलकर आणि प्रगल्भ अभ्यासक पी.यू. बनसोडे गुरुजी यांनी प्रमुख






मार्गदर्शन केले. त्यांनी सामाजिक समता, स्त्रीमुक्ती, शिक्षणाचे महत्त्व व आत्मनिर्भरतेचे मूल्य यावर सखोल विचार मांडले.

कार्यक्रमाच्या आयोजक व सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सौ. राजश्री राहुल चौधरी यांनी महिलांना संबोधित करताना सांगितले की, लवकरच महिलांसाठी तीन दिवसांचा स्वयंरोजगार विषयक विशेष मार्गदर्शन कार्यक्रम सरकारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आयोजित केला जाईल. या उपक्रमांतर्गत ४० महिलांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक साहित्य व कर्जसुविधेसाठी मदत करण्यात येणार असून, उद्यम आधार नोंदणी करून दिली जाईल. तसेच, तीन दिवसांच्या प्रशिक्षणानंतर सर्व सहभागी महिलांना शासनमान्य स्वयंरोजगार प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे महिलांना स्वतःच्या बळावर रोजगार उभारता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वेळी कु. जागृती चौधरी (उपाध्यक्ष), निरंजन खैरनार (सचिव व तालुका संयोजक—जोगेश्वरी), श्री राहुल परदेशी (सहसचिव), सौ. आशा निकाले (सदस्य), ॲड. आम्रपाली वाव्हाळे (जिल्हा संयोजक), विलास बाबा गायकवाड (तालुका संयोजक—खुलताबाद), श्री अनिल कुमार तांदळे (जिल्हा संयोजक) यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

एकूणच, या प्रबोधन शिबिराने सामाजिक जागृतीसह महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा ठोस मार्ग दाखवला, अशी प्रतिक्रिया उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# 'गणित-भूगोलाच्या सुरेल संगमातून संस्कृतीचे दर्शन'

## ज्ञानसंपदा शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

ज्ञानसंपदा शाळेत दरवर्षी नाविन्यपूर्ण शैक्षणिक संकल्पनांवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन साजरे केले जाते. याच परंपरेनुसार यंदाचे स्नेहसंमेलन गणित, भूगोल आणि भारतातील नद्यांचे पौराणिक व भौगोलिक महत्त्व या अभिनव संकल्पनेवर आधारित असून, ते दोन दिवस अत्यंत उत्साही व आनंदी वातावरणात पार पडले.

या स्नेहसंमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे अभ्यासक्रमाला कलेची प्रभावी सांगड घालून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणे. यावर्षी विद्यार्थ्यांनी गणितातील अंक, बेरीज-वजाबाकी यांचे नृत्य, नाटिका व वेशभूषांच्या माध्यमातून कल्पक सादरीकरण केले. यामुळे गणिताचा विषय केवळ पुस्तकापुरता मर्यादित न राहता रंगमंचावर सजीव झाला. भारताच्या भौगोलिक वैविध्याचे दर्शन घडवताना विद्यार्थ्यांनी गंगा, यमुना, सरस्वती आदी पवित्र नद्यांचे पौराणिक संदर्भ, सांस्कृतिक परंपरा व सामाजिक महत्त्व नृत्यनाटिका व बालनाट्यांच्या माध्यमातून प्रभावीपणे सादर केले. या सादरीकरणांतून पर्यावरण संवर्धन व सांस्कृतिक जतनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर शाळेच्या वार्षिक अहवालाचे वाचन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शैक्षणिक, क्रीडा, विविध स्पर्धा व स्पर्धा परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी नामोल्लेख करून गौरव करण्यात आला.

पहिल्या दिवशी पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी गणित संकल्पनेवर आधारित नृत्य, नाटिका व आकर्षक सादरीकरणे सादर केली. दुसऱ्या दिवशी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी भारतातील नद्यांवरील पौराणिक कथांचा आधार घेत सामाजिक संदेश देणारी सादरीकरणे करून उपस्थितांची दाद मिळवली. संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, मानद सचिव अरुण कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर तसेच विश्वस्त सौ. सरिता प्रवीण बजाज, सौ. मिलन मिलिंद गंधे, श्रीमती आशा अशोक सोनवणे व श्रीमती लता अशोक भगत यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक व शिक्षकांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाची सांगता भावपूर्ण गंगा आरतीने करण्यात आली. पालक प्रतिनिधी जावेद शेख यांनी आपल्या मनोगतातून या आगळ्यावेगळ्या स्नेहसंमेलनाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुद्र कवडे, श्रावणी पांडेकर, सई पाठक, खुशी काळे, मनीषा नकाते, भाविका सांगळे व श्रेया करवंदे यांनी केले. गणित संकल्पनेचे कार्यक्रम प्रमुख पूजा भाटिया, तर भूगोल संकल्पनेचे कार्यक्रम प्रमुख सोमा दास होत्या. संपूर्ण कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. आभार प्रदर्शन कैलास जाधव यांनी केले. या नाविन्यपूर्ण व शैक्षणिक दृष्ट्या समृद्ध स्नेहसंमेलनाबद्दल पालकवर्गातून सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## नोंदणीला मुदतवाढ द्या

**कळवण : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना विविध तांत्रिक अडचणी, कागदपत्रांची पूर्तता, सर्व्हर डाऊन तसेच इतर कारणांमुळे वेळेत नोंदणी करण्यात अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे अन्न व पुरवठा , ग्रामक संरक्षण विभाग यांनी ऑनलाईन नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी शेतकरी आहे. खरीप पणन हंगाम २०२४-२५ अंतर्गत शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान, मका, सोयाबीन, भात, नागली, ज्वारी, रागीसह भरड धान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्यास ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु सर्व्हर डाऊन असल्या कारणाने ऑनलाईन नोंदणीसाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे शासनाने जोपर्यंत शेतकऱ्यांची ऑनलाईन पूर्ण होत नाही.

## कुंटूरकर शुगरला तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार जाहीर

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**



राज्यातील साखर कारखान्यांना मार्गदर्शन करणारी व साखर उद्योगात अग्रेसर असलेली शिखर संस्था वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (मांजरी बु.) यांच्या मार्फत राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना गळीत हंगामात सर्वोत्कृष्ठ कामगिरीबद्दल दरवर्षी पुरस्कार प्रदान करण्यात येतात. त्यानुसार कुंटूरकर शुगर अँड एग्रो प्रा. लिमिटेड या साखर कारखान्यास गळीत हंगाम २०२४/ २५ मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल उत्तर पूर्व विभागातून द्वितीय क्रमांकाचा 'तांत्रिक कार्यक्षमता' पुरस्कार दिनांक २४ डिसेंबर रोजी जाहीर झाल्याचे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट ने एका पत्रकाद्वारे कळविले असल्याची माहिती कुंटूरकर शुगरचे चिफ अकाउंटंट आनंद जाजू यांनी दिली. कुंटूरकर शुगर अँड एग्रो प्रा. लिमिटेड या साखर कारखान्याने हे तांत्रिक निकष तंतोतंत पाळल्यामुळे कारखान्याला उत्तर पूर्व विभागात 'तांत्रिक कार्यक्षमता' द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार माजी केंद्रीय कृषी मंत्री व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (व्ही.एस.आय) चे अध्यक्ष खा. शरदचंद्रजी पवार ,महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार , वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे उपाध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव वळसे पाटील,यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २९ डिसेंबर रोजी पुणे येथे सदरचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कुंटूरकर शुगर अँड एग्रो प्रा.लिमिटेड या साखर साखर कारखान्याचे चेअरमन तथा कार्यकारी संचालक राजेश देशमुख कुंटूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली व कुशल नेतृत्वाखाली सदरील कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू आहे. त्यामुळे सदरचा पुरस्कार जाहिर झाल्या मुळे सर्व ऊस उत्पादक शेतकरी, तोंडणी व वाहतूक ठेकेदार, मजूर, प्रतिष्ठित नागरिक व हितचिंतकातून कारखान्याचे चेअरमन तथा कार्यकारी संचालक राजेश देशमुख कुंटूरकर यांच्यावर जिल्ह्यासह नायगाव विधानसभा मतदार संघातून शुभेच्छासह कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

# दिवा शहरात वंचित बहुजन आघाडीला बळकटी

- राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



दिवा शहरातील राजकारणाला नवे वळण मिळाले असून वंचित बहुजन आघाडीमध्ये अनेक सक्रिय कार्यकर्त्यांचा जाहीर प्रवेश झाला आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मा. अ‍ॅडव्होकेट बाळासाहेब आंबेडकर, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा मा. रेखाताई ठाकूर व ठाणे शहर अध्यक्ष मा. महेंद्र अनभोरे यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश सोहळा पार पडला. या वेळी अमोल प्रकाश जाधव, रोहित मदन बागुल, अक्षय म्हस्के, राहुल कांबळे, मुकेश शर्मा, सुयश शिंदे, दोडके करोटिया व सुचिता जाधव यांनी वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश करून पक्षाच्या विचारधारेशी एकनिष्ठ राहून काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

प्रसंगी कार्यक्रमाला महासचिव मा. मोहन नाईक, मा. विकास इंगळे (कल्याण ग्रामीण), मिलिंद गवई (दिवा विभाग प्रमुख), सौ. गाथा विकास इंगळे (दिवा विभाग उपाध्यक्षा) यांच्यासह प्रह्लाद महसके, संदीप खरात, संभाजीराव वानखडे, राजू दावरे, रवि कांबळे, गौतम महसके, रुपेश कांबळे, देवेंद्र कांबळे, गणेश पवार, अरविंद कदम व पंडगाले आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रवेशामुळे दिवा शहरातील वंचित बहुजन आघाडी अधिक संघटित व मजबूत होणार असून आगामी स्थानिक राजकारणात पक्षाची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

## 'स्टार्स ऑफ हॅपीनेस'उपक्रमाची सुरुवात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देशातील आघाडीचा 'रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट'(REIT) असलेल्या 'नेक्सस सिलेक्ट मॉल्स'ने 'स्टार्स ऑफ हॅपीनेस' हा उद्देशपूर्ण ख्रिसमस उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सणासुदीचा आनंद देण्याच्या भावनेतून समाजासाठी काही तरी करण्याची संधी निर्माण केली जात आहे. 'लाइट ए स्टार, लाइट ए लाइफ' या संदेशावर आधारित, 'नेक्सस वेस्टएंड मॉल' मध्ये ग्राहक लहान तारे खरेदी करून भव्य ख्रिसमस ट्री पूर्ण करतील. प्रत्येक तारा स्थानिक बालकल्याण संस्थांना (एनजीओ) पाठबळ देणार आहेआनंद ही संकल्पना 'नेक्सस'च्या प्रत्येक उपक्रमाच्या नेहमीच केंद्रस्थानी राहिली आहे.

# कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने ची शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था कृषि विज्ञान केंद्र, दहिगाव-ने च्या ११ वी शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक दहिगाव-ने येथे दि. २४ डिसेंबर रोजी संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा.श्री. काकासाहेब शिंदे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे आयसीएआर 'अटारी' पुणे चे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. सय्यद शाकिर अली यांची उपस्थिती लाभली.

यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.श्याम सुंदर कौशिक यांनी केव्हीके दहिगाव-ने चा प्रगती अहवालाचे सादरीकरण केले. तर श्री. माणिक लाखे, श्री. नारायण निबे, श्री. सचिन बडधे, श्री. नंदकिशोर दहातोंडे, इंजि. राहुल पाटील व डॉ. चंद्रशेखर गवळी यांनी आपआपले विभागाच्या प्रगती अहवालाचे सादरीकरण केले.

या सल्लागार समितीच्या बैठकीस समितीचे सदस्य व महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील कृषि तंत्रज्ञान प्रसारक केंद्राचे व्यवस्थापक डॉ. आनंद चवई, कृषिविद्या विभागाचे डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. दत्तात्रय पाचारणे, उद्यानविद्या विभागाचे डॉ. अन्सार खान अत्तार, 'आत्मा' अहिल्यानगर चे प्रकल्प संचालक श्री.पी.एस.लाटे, राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन संचालनालयाचे डॉ. करू अप्पा, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड राहुरी चे व्यवस्थापक डॉ.सरोज वहाने, ऑल इंडिया रेडिओ अहिल्यानगरचे कार्यक्रम अधिकारी श्री. सुदाम बटुळे, जिल्हा पशु संवर्धन अधिकारी डॉ. दशरथ दिघे, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. पी. शिंदे, महाबीज चे जिल्हा व्यवस्थापक श्री. सुनिल दौंड, बँक ऑफ बडोदा चे व्यवस्थापक श्री. दिपक कुमार सिंह, जिल्हा बीज प्रमाणीकरण अधिकारी श्री. विक्रम अर्णव हे हजर होते.

यावेळी दूरदृश्य प्रणालीद्वारे डॉ. सय्यद शाकिर अली यांनी शेतीमध्ये मूल्यवर्धन, यांत्रिकीकरण, हवामान आधारित शेती, आपत्कालीन पीक व्यवस्थापन, चा-यासाठी मुरघास व नैसर्गिक शेती चा प्रसार कृषि विज्ञान केंद्राकडून व्हावा असे नमूद केले.

डॉ. आनंद चवई यांनी जमिनीचे व मानवाचे आरोग्य या दोन्ही गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे नमूद करताना नाचणी पिकाचे क्षेत्र वाढवण्यास संधी असल्याचे सांगितले. श्री. पी.एस.लाटे यांनी निर्यातक्षम फळपिके बाबत संधी असल्याचे सांगितले तर श्री. सुदाम बटुळे यांनी आकाशवाणी अहिल्यानगर शेती तंत्रज्ञान प्रसार व शेतक-यांच्या हिताकरिता सदैव तत्पर असल्याचे सांगितले. डॉ. वहाने व डॉ. दिघे यांनी जिल्ह्यामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी कशाप्रकारे संधी उपलब्ध आहेत याबद्दल आपले विचार प्रकट केले.

# ३ रनर्सने बॉर्डर अल्ट्रा मॅरेथॉन १०० माईल अंतर यशस्वी पार केले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर रनर्स क्लब (ARC) ने पुन्हा एकदा भारतीय अल्ट्रा रनिंगच्या क्षेत्रात इतिहास रचला आहे. क्लबचे रनर्स विलास भोजणे, गौतम जायभाय, हरीश काबरा यांनी प्रतिष्ठित बॉर्डर अल्ट्रा मॅरेथॉन – १०० माईल (१६१ की.मी.) ही अतिशय कठीण मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण करून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ऐतिहासिक पराक्रम करून एक चांगली कामगिरी केली आहे.

ही स्पर्धा राजस्थानमधील जैसलमेरच्या वाळवंटी भागात आयोजित केली जाते व तिचा शेवट भारत-पाकिस्तान सीमेवरील लोंगेवाला पोस्ट येथे होतो. तीव्र उष्णता,लांब व एकाकी मार्ग आणि प्रचंड शारीरिक-मानसिक आव्हाने यामुळे ही स्पर्धा भारतातील सर्वात कठीण अल्ट्रा मॅरेथॉनपैकी एक मानली जाते.

अहिल्यानगर जिल्ह्यातून प्रथमच तीन धावपटूंनी एकत्रितपणे १०० माईल अंतर पूर्ण करण्याची किमया साध्य केल्याने ही कामगिरी विशेष महत्त्वाची ठरली. जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात नवा मानदंड निर्माण केला असे टीम प्रमुख योगेश खरपुडे यांनी सांगितले.

अहिल्यानगर रनर्स क्लबने सातत्याने लाँग डिस्टन्स धावण्यात उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. क्लबकडे जिल्ह्यातील पहिले ३ कॉम्रेड्स मॅरेथॉन B2B फिनिशर्स, त्यानंतर ११ धावपटूंनी १०० किलोमीटर अल्ट्रा मॅरेथॉन पूर्ण केल्याचा विक्रम, आणि आता पहिले तीन १०० माईल फिनिशर्स असा गौरवशाली प्रवास आहे.

संरचित प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि संघभावना यावर भर देत ARC सतत उत्कृष्ट धावपटू घडवत असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नवे विक्रम आणि नवे टप्पे गाठत आहे असे टीम प्रमुख जगदीप मकर म्हणाले.

या तिन्ही धावपटूंना त्यांच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात ARC च्या सर्व सदस्यांचे भक्कम पाठबळ लाभले.तसेच टीम लीडर्स योगेश खरपुडे आणि जगदीप मकर यांच्या मार्गदर्शनामुळे व नेतृत्वामुळे हा ऐतिहासिक टप्पा गाठणे शक्य झाले. यासाठी त्यांना कुटुंबाचा,मित्र परिवाराचे प्रोत्साहन मिळाले.

या यशाबद्दल अहिल्यानगरच्या संपूर्ण धावपटू समुदायाला अभिमान असून विलास भोजणे, गौतम जायभाय, हरीश काबरा यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

ही कामगिरी निश्चितच अनेक नव्या धावपटूंना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आणि स्वतःच्या मर्यादा ओलांडण्यासाठी प्रेरणा देईल. मनोगत जगदीप मकर यांनी व्यक्त केले.


## हरेगाव येथे विविध कार्यक्रम संपन्न

**वडाळा महादेव: (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले संत तेरेजा चर्च येथे नाताळ सणानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख धर्मगुरू फादर डॉमिनिक रोझारियो फादर फ्रान्सिस ओहोळ फादर थॉमस यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी आठ वाजता पवित्र मिस्सा अर्पण करण्यात आला. यावेळी पंचक्रोशीतील बहुसंख्य ख्रिश्चन बांधव नाताळ सणानिमित्त उपस्थित होते. पानोडी धर्मग्रामाचे रे.फा. थॉमस यांनी आपल्या उपदेशात देव आपल्या मध्ये येऊन सर्व मानव जातीची काळजी घेतो हे त्यांनी अनेक दाखले देऊन भाविकांना पटवून दिले. नाताळ सणाचा आनंद आपण एकमेकांच्या सहवासात द्विगुणीत करावा असे प्रतिपादन त्यांनी केले.

# कुंभेरी नदीजवळ चारचाकीची दुचाकीला धडक

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



- एकाचा जागीच मृत्यू, एक गंभीर
- पडघा पोलिसांकडून चालक ताब्यात

मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी-पडघा हद्दीत कुंभेरी नदीजवळ भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. ही भीषण दुर्घटना बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साडे अकराच्या सुमारास घडली. या अपघातात सुनिल नवनीत कांबळे (वय ३८, रा. चेंबूर, रेतीबंदर) यांचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यांचा मित्र गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर कल्याण बायपास येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, चेंबूर, रेतीबंदर येथील दोन मित्र आपल्या ॲक्टिव्हा दुचाकीवरून चेंबूर येथून शिर्डीसाठी निघालेल्या पालखीचे काही साहित्य देण्यासाठी नाशिकच्या दिशेने गेले होते. काम आटोपून परतीचा प्रवास करत असताना पडघा नजीक मुंबई-नाशिक महामार्गावरील कुंभेरी नदीजवळ , नाशिककडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.सदर अपघाताची माहिती मिळताच पडघा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी भिवंडी येथील स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश रोठे करीत आहेत. या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मृत सुनिल कांबळे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार असून कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच, या अपघातामुळे चेंबूरहून शिर्डीकडे निघालेल्या काही साईभक्तांना अर्ध्या प्रवासातूनच परतावे लागले. दरम्यान, मुंबई-नाशिक महामार्गावर सातत्याने घडणाऱ्या अपघातांमुळे रस्ते सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. हा महामार्ग देशातील अत्यंत वर्दळीचा मार्ग असून वेग नियंत्रण, योग्य सुरक्षा उपाययोजना आणि दुचाकीस्वारांसाठी सुरक्षित व्यवस्थेचा अभाव असल्याने दरवर्षी अनेक निष्पापांचे बळी जात आहेत.

# मार्केट वसुली लिपीक यांना निलंबित करावे : रवींद्र वखारे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



श्री. पवार बी.एल. हे मार्केट विभागात वसुली लिपिक म्हणून कार्यरत असतांना त्यांचेकडे वाडिया पार्क शॉपिंग सेंटर, माळीवाडा शॉपिंग सेंटर, सिध्दीबाग व्यायाम शाळेजवळील शॉपिंग सेंटर, अमरधाम कंपौंड लगत, गाडगीळ पटांगण, अमरधाम शॉपिंग सेंटर, श्री छत्रपती संभाजी महाराज शॉपिंग सेंटर, छाया टॉकीज शॉपिंग सेंटर या व्यापारी संकुलातील गाळेभाडे वसुलीचे कामकाज होते. श्री. पवार यांनी गाळेधारकांकडून भाडयापोटी रु.३०००/- घेऊन त्या रकमेची पावती दिलेली असल्यास मनपा फंडात रु.३०००/- जमा होणे आवश्यक होते. त्यांनी तसे न करता मनपा फंडात फक्त रु.३००/- जमा केलेले आहेत. श्री. पवार यांनी गाळाधारकांस जी मुळ पावती दिलेली आहे, त्यावर रुपये ३०००/- ची नोंद आहे, परंतु डुप्लीकेट पावतीवर रु.३००/- ची नोंद आहे. या सोबत जोडलेल्या मुळ पावत्या व डुप्लीकेट पावत्याच्या व भरणा रजिस्टरच्या छायांकीत प्रती पाहता हे दिसून येते व सिध्द होत आहे. सदर प्रकरणी श्री. पवार यांची सखोल चौकशी करावी.व त्यांना निलंबित करावे अशी मागणी श्री रवींद्र वखारे यांनी मा. प्रधान सचिव व मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

# सातत्य हेच यशाचे गमक आहे - आयर्नमॅन पंकज मुठे

**राजूर : (समर्थ गांवकरी)**




राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेच्या गुरुवर्य रा.वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ संस्थेचे सचिव एम. एल. मुठे यांच्या अध्यक्षतेखाली दिमाखात संपन्न झाला.

यशस्वी होण्यासाठी वेळेचे योग्य नियोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. जीवनात छोट्या-छोट्या गोष्टींचा त्याग करा, सोशल मीडियाचा कमीत कमी वापर करा, चांगल्या संगतीत रहा, अपयश मनातून काढून टाका, स्पष्ट ध्येय ठरवा आणि मोठी स्वप्ने पहा. तुमच्या क्षेत्रात आयर्नमॅन बना; त्यासाठी सातत्य आवश्यक असून सातत्य हेच यशाचे गमक आहे, असे प्रतिपादन पंकज मुठे यांनी केले. ते आयर्नमॅन कॅलिफोर्निया स्पर्धेचे विजेते असून या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करत होते.

कार्यक्रमात पुढे बोलताना पंकज मुठे म्हणाले की, ध्येय, प्रेरणा, शारीरिक-मानसिक तयारी आणि आत्मविश्वास यांमधूनच व्यक्तीची गुणवत्ता स्पष्ट होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. किरण लहामटे म्हणाले, "आयुष्याचा सुरुवातीचा काळ कष्टाचा असेल तर पुढील आयुष्य सुखाचे होते. आयुष्य ही एक विशाल रंगभूमी असून आपण सर्व त्यावरील कलाकार आहोत."

विद्यार्थ्यांनी आवडीनुसार क्षेत्र निवडावे, स्पर्धा परीक्षांतून यश मिळवावे, उद्योजक बनावे, निर्भय राहावे तसेच आई-वडील व गुरूजनांचा आदर करावा, असा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव एम. एल. मुठे होते. यावेळी कोषाध्यक्ष विवेकजी मदन, माजी सचिव टी. एन. कानवडे, संचालक प्रकाश टाकळकर, एस. टी. येलमामे, विजय पवार, विलास पाबळकर, माजी प्राचार्य विलास नवले, लहानू पर्बत, प्रकाश महाले, निलेश देशमुख, सदस्या मैड ताई, कचरे साहेब, प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख, भाऊसाहेब बनकर, संपत धुमाळ, दीपक बुऱ्हाडे यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारंभात शैक्षणिक वर्षात विविध क्षेत्रांत विशेष नैपुण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

तसेच राज्यस्तरीय बेस्ट ऑफिसर पुरस्कार प्राप्त शिक्षक संजय देशमुख आणि रोटरी क्लब राष्ट्र बांधणी पुरस्कार प्राप्त शिक्षिका कविता वाळुंज यांचा विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची प्रस्तावना व स्वागत प्राचार्य भाऊसाहेब बनकर यांनी केले. मान्यवरांचा परिचय दीपक पाचपुते यांनी करून दिला.

सूत्रसंचालन संतराम बारवकर यांनी केले तर उपप्राचार्य दीपक बऱ्हाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पीछेहाट कम्युनिस्ट पक्षाची



## संपादकीय

बरोबर १०० वर्षांपूर्वी २६ डिसेंबर १९२५ रोजी 'अधिकृत' कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. अधिकृत हा शब्द यासाठी की मानवेंद्रनाथ रॉय (एम. एन. रॉय) यांनी १९२० साली ताश्कंद (आजचे उझबेकीस्तान) येथे त्यांच्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली होती. परंतु, अधिकृत इतिहासानुसार आणि सर्व राजकीय पक्षांनी अधिकृतपणे स्वीकारलेली तारीख २६ डिसेंबर हीच आहे. आणि म्हणूनच पक्षस्थापनेची राष्ट्रीय आणि जागतिक परिस्थिती समजून घ्यायला हवी. १९२५ या वर्षाची अखेर. रशियातील लेनिनप्रणीत कम्युनिस्टांची 'बोल्शेविक क्रांती' होऊन फक्त आठ वर्षे झाली होती. या क्रांतीविषयीची माहिती त्याकाळी इंग्लिश वृत्तपत्रांतूनच येत असे. परंतु, भारतातील ब्रिटिश सरकार कम्युनिस्ट चळवळीच्या विरोधात असल्यामुळे वृत्तपत्रांतून येणाऱ्या बातम्या या क्रांतीची, लेनिनची तसेच कम्युनिस्ट विचारसरणीचीही बदनामी करणाऱ्या असत. टिळकांच्या 'केसरी' मधून मात्र या क्रांतीला संपूर्ण पाठिंबा दिला जात असे. टिळकांचे स्पष्टीकरण सोपे व स्पष्ट होते. ज्याअर्थी ब्रिटिश वृत्तपत्रे आणि इंग्रज सरकार त्या क्रांतीच्या आणि लेनिनच्या विरोधात एवढी प्रखर भूमिका घेतात, याअर्थी नक्कीच त्या क्रांतीला व लेनिन या त्यांच्या नेत्याला विशेष महत्त्व आहे. ते जे काही करत असतील ते ब्रिटिश साम्राज्याला धक्का लावणारे असेल.. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे हेसुद्धा ब्रिटिश वृत्तपत्रे व त्यातील बातम्या व लेखांचा अर्थ, अन्वयार्थ बारकाईने लावत असत. या काळात (म्हणजे १९१५ ते १९२२) भारतात स्वातंत्र्य चळवळ खोलवर रुजत चालली होती. देशात गांधीजींचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत होता. कॉम्रेड डांगेंनी त्या परिस्थितीत 'गांधी विरुद्ध लेनिन' हे लहानसे पण महत्त्वाचे पुस्तक लिहिले. तेव्हा डांगेंचे वय फक्त २३ वर्षांचे होते आणि गांधीजींना भारतात येऊन फक्त सात वर्षे झाली होती. त्यावेळेस भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत



विविध विचारप्रवाह प्रचलित होते. लोकमान्य टिळकांचा जहाल राष्ट्रवाद, नामदार गोपाळ कृष्ण गोखलेंचा मवाळ राष्ट्रवाद, गोपाळ गणेश आगरकरांचा सुधारक विचार, काही मोजक्या तरुणांचा सशस्त्र लढा देण्याची तयारी करणारा प्रयत्न, हिंदू महासभेचा हिंदू राष्ट्रवाद (या महासभेची स्थापना १९१५ची, म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अगोदर १० वर्षे), पण सावरकर तेव्हा तुरुंगात होते.. याखेरीज भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत आणखी एक प्रवाह होता तो ब्रिटिशांशी जमवून घ्यावे असे मानणारा! या सगळ्या भारलेल्या वातावरणातल्या तत्कालीन भारतात कम्युनिस्ट विचारसरणी तितकीशी समर्थपणाने पोचलेली नव्हती, तरीही कॉम्रेड डांगेंनी ते पुस्तक लिहिले. एका अर्थाने त्या पुस्तकातूनच भारताला कम्युनिस्ट विचारसरणीची प्राथमिक ओळख झाली, असे म्हणता येईल. एम. एन. रॉय यांनीही ताश्कंदमधून एक पुस्तिका लिहिली होती; पण ती देशभरात फारशी पोचलीच नव्हती. वस्तुत: कॉम्रेड डांगे यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेला हजर राहणे सयुक्तिक होते. पण इंग्रज सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला लावून त्यांना तुरुंगात टाकले होते. 'कानपूर कट' म्हणून तो ओळखला जातो. डांगेंनी पक्षस्थापनेची राजकीय-वैचारिक तयारी केलीच होती. त्यामुळे जरी ते पक्षस्थापनेच्या मुहूर्ताला हजर नसले तरी त्यांनाच 'संस्थापक' मानले जाते. कानपूर खटला १९२४ चा आणि पक्षाची स्थापना १९२५ मध्ये. याचवर्षी रा. स्व. संघाचीही स्थापना झाली.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ६४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | 8 | | | 6 | |
| | 6 | | | 5 | 9 | 2 | | |
| 4 | | 8 | | | | 5 | | 9 |
| | 3 | 7 | | 2 | | 9 | | 6 |
| 6 | | 4 | | | | 1 | | 8 |
| 9 | | 5 | | 1 | | 4 | 2 | |
| 8 | | 3 | | | | 6 | | 1 |
| | | 6 | 1 | 7 | | | 9 | |
| | 1 | | | 3 | | | | 5 |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ६३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | 7 | 2 | 8 | 6 | 3 | 4 | 5 |
| 5 | 4 | 6 | 1 | 3 | 7 | 2 | 9 | 8 |
| 8 | 2 | 3 | 9 | 5 | 4 | 6 | 1 | 7 |
| 2 | 5 | 4 | 6 | 9 | 3 | 7 | 8 | 1 |
| 6 | 8 | 1 | 7 | 4 | 2 | 9 | 5 | 3 |
| 7 | 3 | 9 | 5 | 1 | 8 | 4 | 2 | 6 |
| 3 | 9 | 5 | 4 | 6 | 1 | 8 | 7 | 2 |
| 1 | 6 | 2 | 8 | 7 | 9 | 5 | 3 | 4 |
| 4 | 7 | 8 | 3 | 2 | 5 | 1 | 6 | 9 |

उत्तर उद्याच्या अंकात

पंचांग
२६डिसेंबर२०२५
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
पौष शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- पौष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:षष्टी १३:४३:४८
नक्षत्र:शतभिषा

०९:००:१२
योग:सिद्ध १४:००:२७
करण:तैतिल १३:४३:४८
करण:गर २५:३१:२८+
सूर्य:धनु
चन्द्र:कुम्भ

## उपदेशाचे डोस

### ईश्वर भावाचा भुकेला

सत्यभामा श्रीकृष्णाची लाडकी पत्नी होती. एकदा तिने श्रीकृष्णाची सुवर्णतुला करण्याचे मनात आणले. तुलेसाठी श्रीकृष्ण तराजूच्या एका पारड्यात जाऊन बसला. दुसऱ्या पारड्यात सत्यभामेने आपले सोन्याचे सगळे दागिने घातले. पण श्रीकृष्णाचे पारडे जागचे हालेना. ते वर उचलले जाईना. आता काय करावे हे तिला सुचेना. तेव्हा तिने रुक्मिणीची विनवणी केली. रुक्मिणीने प्रथम मनापासून श्रीकृष्णाची प्रार्थना केली. नंतर अत्यंत प्रेमाने एक तुळशीदल त्या दागिन्यांवर ठेवले. त्याबरोबर श्रीकृष्णाचे पारडे वर उचलले. सत्यभामा काय समजायचे ते समजून गेली. भाव म्हणजे ईश्वराच्या आस्तित्वाबद्दल असीम श्रद्धा, देवा तूच एक आहेस, तुझ्यावाचून काही नाहीच' अशी दृढ श्रद्धा असते.

कथा उपदेश : ईश्वरावरील श्रद्धेला दृश्याचे नियम लागू नाहीत. जीवनाने बाह्यात कितीही बदलू दे. माणसाच्या अंतरंगातील भाव पूर्ववत राहू शकते.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८९८- क्युरी पती-पत्नींने रेडियमचा शोध लावला.
- २००६- फिलीपाईन्समधील डिपार्टमेन्ट स्टोअरला आग; २४ जण ठार.
- २००६- नायजेरियात पाईपलाईनच्या स्फोटात २०० ठार.

### राष्ट्रीय

- २००३- वीरेंद्र सेहवागचे कारकिर्दीतील पहिले शतक, मेलबोर्न येथील तिसऱ्या कसोटीत १९५ धावा.
- २००४- ८.९ तीव्रतेच्या भूकंपात व नंतरच्या सुनामीमुळे सव्वा लाखाहून अधिक व्यक्ती ठार.
- २००७ - भारतीय पोलिस सेवेतील पहिल्या महिला अधिकारी किरण बेदींच्या स्वेच्छा सेवा निवृत्ती (व्हीआरएस) च्या अर्जाला केंद्र सरकारने मंजूरी दिली.
- २००७ - मराठीतील ज्येष्ठ समीक्षक गो. मा. पवार यांना २००७ चा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला.


### जन्म

- १६६६- दहावे शीख गुरू गोविंदसिंग यांचा जन्म.
- १८९३- चीनचे साम्यवादी नेते माओझेडूंग यांचा जन्म.
- १९१४- कुष्ठरोगींच्या कल्याणासाठी आयुष्यभर कार्यरत असलेल्या समाजसेवक देविदास मुरलीधर तथा बाबा आमटे यांचा जन्म.

### निधन

- १९७२- जपानवर अणुबॉम्ब टाकण्याचा निर्णय घेणाऱ्या हॅरी ऐस ट्रूमन या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचे निधन.
- १९९९- महाराष्ट्राचे माजी राज्यपाल व भारताचे माजी राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ६४



### आडवे शब्द

१.साक्षरतासाठी चालवले जाणारे एक अभियान
६.लोकमान्य टिळकांचा एक प्रसिध्द ग्रंथ
९.वाळु,माती
१०.क्रिकेटमधील धाव
११.आई,जननी
१२.कर्ता,करविणारा
१४.हिंदीत घर
१५.अर्धवर्तुळाकार आकार
१६.न सम जण्याजोगे,आकलन होणार नाही असे
१८.जहाल विरूध्द
२०.अस उलटे करा
२२.ज्याच्यात जीव आहे असा, २४.पंख
२५.नाही म्हणने
२७.दाहेव उलटे करा
२९.भगवा चे व काढुन दा लावा
३१.धास्ती,धाकाची भिती
३३.शिवसैनिक
३४.एक प्रेमी युगल राजाराणी
३६.रोगपरिक्षा
३७.नवरदेव
३८.मासा,एक रास
४०.लायक नसलेला
४२.रसाने भरलेला
४४.तडजोड,व्यवस्था
४७.पवन,वात
४८.कपाळ,ललाट
५०.मर्त्य,मयत
५१................. वार्ता विघ्नाची,श्रीगणेश आरतीची सुरूवात
५६.राजपुत्र,युवराज
५८.निघालेला,मार्गस्थ
५९.पावसाची वाट पाहणारा एक पक्षी
६०.अर्ध्या ओंजळीचे माप
६२.कामासह
६४.गडावरील पहारेकरी
६५.भुतकाळातला, गेलेल्या काळाचा
६९.दाबुन टाकण्याजोगे
७१.तुल्य,सारखा
७३.मऊ धोरणाचा
७४.निकाल,निवाडा
७५.विवाहासाठी जमलेली मंडळी
७७.इंग्रजीतला विजेता
७८.सरळ,थेट
८०.नाडी,तपकीर
८१.जंगल,वन,अरण्य
८३.आलमारी
८४.पाठीमागचे दार
८५.एकदम शांतता,स्तब्धता

### उभे शब्द

१.संगीतातील सात स्वर
२.घाव,जखम
३.नक्षत्र,चांदणी
४.एक गोड व आंबट फळ
५.याचना करणारा
६.हिंदुचा एक पवित्र ग्रंथ
७.कॉलम,खाना
८.प्रतिबंध,मना
११.मानलेला
१३.राजाची बायको
१४.घाण,कचरा
१६.बदनामी,नामुष्की
१७.मुरलीधराची आई
१९.संपत्तीचा हक्कदार
२१.सतत,अखंड
२३.आयुष्य,पाणी म्हणजे ....
२६.कावळयाचा रंग
२८.नवरा,पती
२९.प्रलयंकारी, अवाढव्य
३०.चाल,वेग
३२.लोखंड घासण्याचे साधन
३३.आईची बहीण
३५.मेलेला,मर्त्य
३९.चित्ताकर्षणासाठी केलेला हावभाव
४१.सनी देओल,अमिषा पटेल यांचा एक वादग्रस्त चित्रपट
४३.तांजर उलटे करा
४५.हिंदीत तुम्ही
४६.दानव,राक्षस
४७.खबर,बातमी
४८.भाग देणारा
४९.कुल उलटे
५२.दुध आटवुन तयार होणारा एक पदार्थ
५३.पाठीचे मुख्य हाड
५४.शोक,व्यथा
५५.जड नसलेला
५६.रात्री उमलणारे एक फुलझाड
५७.पाठीचे मुख्य हाड,कना
६०.लोखंडाला स्पर्षाने सोने करणारा काल्पनिक दगड
६१.हिंदीत कळी
६३.सहाय्यक,मदत करणारा
६५.हिंदीत दुख,डिंक
६६.पोळया भाजण्याचे साधन
६७.काळया पाठीचे हरीण
६८.पलंग विणण्याची कापडी पटटी
७०.मुसलमान
७२.मोठेपणा,महती
७६.पतन,पडणे
७९.दाट उलटे करा
८१.एक छोटे चार चाकी वाहन,जीप
८२.नविन,नवा

### शब्दकोडे क्र. ६३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.जुगार ४.खजिना ६.दैत्य ७.मंगळागौर १०.लवकर १२.बाजू १३.माया १४.जय १६.वान १७.रखुमाई १८.बोटभर २०.नकलनवीस २२.टकनक २४.बातमीदार २६.डबा २८.रजक ३०.कंद ३१.सण ३२.सरणे ३४.न्यायालय ३६.सराईत ३८.भरीत ४०.जग ४२.तत्पर ४३.नटराज ४६.धमाल ४७.तया ४९.रबर ५१.बक ५३.कंपन ५५.चमत्कार ५७.खतरनाक ५९.यदा ६१.पाना ६२.रणतुंबळ ६३.वरण ६४.नख ६६.जंगली ६९.खापरपणजी ७३.वातड ७४.मालक ७६.वर्तन ७७.कथानक ७८.गाणे ७९.वितरण ८०.वानरी ८१.वडापाव

उभे उत्तर : १.गालबोट ३.रव ४.खर ५.नालायक ६.दैववान ७.मंजूर ८.गौराई ९.रया ११.कदर करणे १२.राजस १४.जनककन्या १५.जलद १६.नवीन १७अ.खुषीत १८.बोकड १९.भट २०अ.लट्ठ २१.तोरणमरण २३.मज २४.बादरायण २५.दास २७.बासरी २९.पायजमा ३०.कंस ३३.रतन ३५.यान ३७.ततपप ३८.भटका ३९.तारा ४१.गलबत ४४.टणत्कार ४५.जर ४६.धर ४८.याचना ५०.बलाबल ५२.करवली ५३.कंकण ५४.नयन ५६.रणरण ५८.नार ६०.दाखल होणे ६१.पारखा ६५.घोर ६६.जंत ६७.गडकरी ६८.काक ७०.पर्वत ७१.पठण ७२.जीवन ७३.वानवा ७४. मानव ७५.लकडा ७८.गाव

# सांस्कृतिक महोत्सवामुळे विद्यार्थ्यांना उर्जा मिळते

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

वर्षभर अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक महोत्सवाची आवश्यकता आहे, अशा महोत्सवांमुळे विद्यार्थ्यांचा ताणतणाव कमी होऊन त्यांना नवी उर्जा मिळते, नवे मार्ग सापडतात. त्याचबरोबर कलाही जोपासले जात असल्याचे मत शिक्षण विभागाचे उपायुक्त सचिन सांगळे यांनी मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी व्यक्त केले.



ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव व स्पर्धा 23 व 24 डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. या महोत्सवाचे उद्‌घाटन समारंभ 23 डिसेंबर रोजी सकाळी 11 वाजता ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 23 किसन नगर येथे झाले.

यावेळी उपायुक्त सचिन सांगळे, प्रभारी शिक्षणाधिकारी शेषराव बडे, गटाधिकारी संगीता बामणे या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्याध्यक्ष सविता चौधरी व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते. सलग दोन दिवस सुरू असलेल्या या सांस्कृतिक महोत्सवांमध्ये नृत्य आणि नाट्य विभाग अशा दोन प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. नृत्य विभागात इयत्ता पहिली ते पाचवीच्या एकूण 30, इयत्ता सहावी ते आठवीच्या एकूण 46 शाळांनी तर नाट्य विभागांमध्ये 26 अशा एकूण 102 शाळांमधील एकूण 2000 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. महोत्सवामध्ये इयत्ता पहिली ते पाचवी पूर्व प्राथमिक आणि इयत्ता सहावी ते आठवी उच्च प्राथमिक अशा दोन विभागांमध्ये नृत्य स्पर्धा तसेच इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी नाट्य स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा अनुक्रमे ठाणे मनपा शाळा क्रमांक 13 खोपट, ठाणे मनपा शाळा क्रमांक 23 किसननगर, आणि ठाणे मनपा शिक्षण विभाग कार्यालय तळमजला हॉल विष्णुनगर, नौपाडा या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या.

स्पर्धेचा निकाल - इ.1 ते 5 नृत्य स्पर्धा : प्रथम क्रमांक- शाळा क्रमांक 53, द्वितीय क्रमांक- शा.क्र 56, तृतीय क्रमांक- शा.क्र 64, उत्तेजनार्थ 1 -शा.क्र 96, उत्तेजनार्थ 2 -शा.क्र 26

इ. 6 ते 8 नृत्य स्पर्धा निकाल - प्रथम क्रमांक- शा.क्र 59, द्वितीय क्रमांक- शा.क्र 18, तृतीय क्रमांक- शा.क्र 25, उत्तेजनार्थ 1- शा.क्र 102, उत्तेजनार्थ 2 -शा.क्र 22

इ.1 ते 8 वी नाट्यस्पर्धा निकाल - प्रथम क्रमांक- शा.क्र 11, द्वितीय क्रमांक- शा.क्र 14, तृतीय क्रमांक- शा.क्र 6, उत्तेजनार्थ 1- शा.क्र 125, उत्तेजनार्थ 2 – शाळा क्र. 40

# ग्राहक चळवळ अधिक मजबूत करण्यासाठी सेवाभावी कार्यकर्त्यांनी पुढे यावे

### उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



ग्राहक संरक्षण कायदा १९८६ अस्तित्वात येऊन अनेक वर्षे उलटली असली, तरी आजही मोठ्या प्रमाणावर ग्राहकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी अपेक्षित जागृती झालेली दिसून येत नाही.फसवणूक झाल्या नंतरही अनेक ग्राहक केवळ माहितीच्या अभावामुळे गप्प बसतात.अशा परिस्थितीत ग्राहकांनी आपल्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ग्राहक संरक्षण कायद्या चा प्रभावी वापर करणे अत्यंत आवश्यक आहे,असे प्रतिपादन जुन्नर व आंबेगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी मा. गोविंद शिंदे यांनी केले.

राष्ट्रीय ग्राहक दिनाचे औचित्य साधून जुन्नर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'ग्राहक प्रबोधन कार्यशाळेत' ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कायद्याचा प्रभावी वापर गरजेचा श्री.शिंदे म्हणाले की, ग्राहक संरक्षण कायदा २०१९अंतर्गत आपणास ग्राहक म्हणून मिळालेले अधिकार आणि या अधिकारा च्या माध्यमातून आपणावर झालेला अन्याय, फसवणुकीबद्दल दाद मागण्यासाठी प्रभावी वापर करावा. हा केवळ कागदावर राहण्यासाठी नसून तो सामान्य ग्राहकाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी साधन आहे. ग्राहकांनी फसवणूक झाल्यास ग्राहक मंचाकडे दाद मागितली, तर त्यांना निश्चितच न्याय मिळू शकतो.मात्र,यासाठी ग्राहकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता असणे आवश्यक आहे.

ग्राहक चळवळ अधिक बळकट करण्यासाठी केवळ कायदे असून चालत नाहीत, तर ते कायदे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणारे निस्पृह, सेवाभावी वृत्तीचे कार्यकर्ते आवश्यक आहेत.

# लोककला महोत्सवाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा-मीडिया सेंटर, दिनांक २४ डिसेंबर- महाराष्ट्राच्या गौरवशाली लोकपरंपरेचे जतन आणि लोककलावंतांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य पारंपरिक लोककला महोत्सवाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त व उदंड प्रतिसाद लाभला. या लोककला महोत्सवात शाहिरी पोवाडा, भारुड, गोंधळ, वाघ्या-मुरळी, गण-गवळण, छकड, लोकगीते, लावणी, मिमिक्री, वाद्यसंगीत, नृत्य, पांगुळ, खंडोबा गीते, वासुदेव बासरी व कविता अशा विविध लोककलेचे बहुरंगी सादरीकरण करण्यात आले.

बाई मी लाडाची... कैरी पाडाची..., आजकाल पाटलाचा लई रुबाब..., आबा सरकून बसा... अशा लोकप्रिय लावण्यांसह खंडोबा गीते, वेस्टर्न नृत्य व ग्रुप डान्सने प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली. या कार्यक्रमात रुपाली पुणेकर, तुकाराम खेडकर यांच्यासह पांडुरंग मुळे, आश्विनी शिवाणी बोरगावकर, सविताराणी पुणेकर, रघुवीर खेडकर, आनंद लोकनाट्य, शिवकन्या बडे आदी कलाकारांनी गण, गवळण, बतावणी, रंगबाजी, लावणी व अन्य पारंपरिक कलांचे सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली.

तमाशा मंडळातील कलाकारांनी सादर केलेल्या आज भरून चालली मंजुळा..., या रावजी... तुम्ही बसा भावजी..., पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची... या लावण्यांवर रसिक प्रेक्षक अक्षरशः थिरकले. जिवंत लोककलेचे हे बहुरंगी दर्शन पाहण्यासाठी लाखो रसिक प्रेक्षकांनी उपस्थिती लावली. यावेळी लोकनाट्य कलावंतांचा स्मृतिचिन्ह शाल आणि पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परशुराम कौशल्य, रमेश पवार व चंद्रकांत मेकाले यांनी केले. गट विकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, विस्तार अधिकारी दमकोंडवार, विस्तार अधिकारी धनंजय देशपांडे, एस. के. पाठक, आर. बी. टेंभुर्णे, एम. एस. म्हेत्रे, युसुफ शेख, दिनेश तेलंग आदींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# पंचायत राज अभियानाचा जागर

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा-मिडीया सेंटर, दिनांक २५ डिसेंबर- श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा यंदा मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरली आहे. या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या प्रदर्शनातून यात्रेकरूंमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती करण्यात आली. यात्रास्थळी ठिकठिकाणी माहितीपर बॅनर लावण्यात आले असून या अभियानासाठी तयार करण्यात आलेल्या गीताची ध्वनीफीत वाजवून नागरिकांपर्यंत संदेश पोहोचविण्यात आला. तसेच निवासी मालमत्ता करावर मिळणाऱ्या पन्नास टक्के सवलतीची माहिती यात्रेच्या माध्यमातून प्रभावीपणे देण्यात आली.

# खऱ्या धुरंदर नगरसेविका नईमा बेग मिर्झा यांना उपनगराध्यक्ष पदाची संधी द्यावी - मुस्लिम समाजातून मागणी

**किनवट: (समर्थ गांवकरी)**

किनवट नगर परिषदेच्या २०२५ च्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक ९ मधून झालेला निकाल हा शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारा ठरला आहे. माजी नगराध्यक्ष, माजी उपनगराध्यक्ष तसेच नगर परिषद प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असलेले धुरंदर राजकारणी साजिद निसार खान यांचा केवळ १३ मतांनी पराभव करत बेग नईमा बेगम मिर्झा सईद यांनी ऐतिहासिक विजय मिळवला असून त्या या निवडणुकीतील "खऱ्या धुरंदर" नगरसेविका ठरल्या आहेत.



किनवट शहरात गेल्या अनेक दशकांपासून खान कुटुंबाचा राजकीय दबदबा राहिला आहे. प्रत्येक निवडणुकीत विजय खेचून आणण्याचे कौशल्य या कुटुंबाकडे असल्याचे नेहमीच पाहायला मिळाले. मात्र २०२५ च्या निवडणुकीत मतदारांनी स्पष्टपणे बदलाचा कौल दिला असून, अनुभवी व मातब्बर नेत्याला पराभूत करून बेग नईमा बेगम मिर्झा सईद यांनी नव्या राजकीय समीकरणांना जन्म दिला आहे.

या विजयामागे मिर्झा परिवाराचा एकसंध प्रयत्न निर्णायक ठरला. बेग नईमा बेगम मिर्झा सईद या शासकीय कंत्राटदार व सामाजिक कार्यकर्ते अन्वर मिर्झा यांच्या मातोश्री असून त्यांच्या विजयासाठी मिर्झा कुटुंबातील सर्व सदस्यांनी प्रचारात जीवाचे रान केले होते. स्थानिक नागरिकांशी थेट संवाद, साधेपणा आणि सामाजिक प्रश्नांवरील ठाम भूमिका यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात जनसमर्थन लाभल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, किनवट नगर परिषदेत महाविकास आघाडीचे नगराध्यक्ष तसेच सन्मानजनक संख्येने नगरसेवक निवडून आले आहेत. या निकालात मुस्लिम मतांची भूमिका निर्णायक ठरली असून, त्यामुळे आता शहरातील मुस्लिम समाजातून सत्तेत योग्य प्रतिनिधित्व द्यावे अशी जोरदार मागणी पुढे येत आहे. विशेषतः, धुरंदर राजकारणी साजिद खान यांचा पराभव करून स्वतःची राजकीय क्षमता सिद्ध केलेल्या बेग नईमा बेगम मिर्झा सईद यांना उपनगराध्यक्ष पदाची संधी द्यावी.

# एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू

- आत्महत्या की घातपात? पोलीस तपास सुरू
- नांदेड पोलीस अधीक्षकांची घटनास्थळी भेट

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार येथे एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून एकाच कुटुंबातील चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून आत्महत्या की घातपात, याबाबत अनेक प्रश्न चिन्ह उपस्थित केले जात आहेत.



बजरंग रमेश लखे वय (२२) आणि उमेश रमेश लखे वय (२५) या दोन सख्ख्या भावांनी मुगट रेल्वे स्थानक परिसरात रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती आहे. तर त्यांचे वडील रमेश होनाजी लखे वय (५१) व आई राधाबाई रमेश लखे वय(४४) हे दोघे घरात मृतावस्थेत आढळून आले.

एकाच कुटुंबातील चार जणांचा अंत झाल्याने जवळा मुरार गावात शोककळा पसरली असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या घटनेचा सर्व बाजूंनी तपास सुरू असून आत्महत्या की घातपात, हे शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, मोठा मुलगा उमेश लखे हा मनसेचा मुदखेड तालुक्याचा माजी उपाध्यक्ष होता. तो सामाजिक कार्यातही सक्रिय असल्याची माहिती आहे.

> प्राथमिक चौकशीत कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याचे समोर आले आहे. घटनास्थळी फॉरेन्सिक टीम, डॉग स्क्वॉड आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट दिली असून तपास सुरू आहे. शवविच्छेदन अहवालानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होईल.
> **— अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड**

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनीही घटनास्थळी भेट देऊन तपासाची पाहणी केली. चारही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

या कुटुंबाचे कोणाशी वाद होते का, कौटुंबिक किंवा आर्थिक अडचणी होत्या का, तसेच घातपाताची शक्यता आहे का, याचा सखोल तपास पोलीस प्रशासन करीत आहेत.


# संगोपन अभावी झाडे गेले वाळून

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

शासनाने रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण मोहीम सुरू असून काही दिवसात संगोपन अभावी झाडं वाळून गेल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. गावाला जोडणाऱ्या प्रत्येक मार्गावर रस्त्याच्या कडेला शासनाने वृक्षारोपण करण्याची मोहीम युद्ध पातळीवर सुरू असताना काही दिवसातच संगोपना अभावी झाडे वाळून गेल्याने शासनाचा हा झाडे लावण्याचा उद्देश कूचकामी ठरत आहे . करोडो रुपये खर्च करून हाती घेतलेल्या वृक्षारोपणाचा कामात दिरंगाई होत असून ही योजना वृक्षाच्या संगोपना अभावी मोजक्या काही दिवसातच झाडे वाळून गेल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. @वृक्ष लागवडीचे काम कोणाचे "सस्पेन्स काय "वन विभागाचे की सामाजिक वनिकरण चे ही माहिती संबंधित दोन्ही विभागात विचारल्यानं दोन्ही विभागाने हे लागवडीचे काम आमचे नाही मग हे काम कोणाचे.

# नेत्र तपासणी शिबिरात ३२५ रुग्णांची तपासणी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



बिलोली तालुक्यातील पाचपिंपळी येथील गंगाबाई पाटील नर्सींग स्कुल येथे श्री साई शिक्षण संस्था पाचपिंपळी व नेत्र लायन्स क्लब नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने कै.गंगाबाई रावसाहेब पाटील पाचपिंपळीकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दि.२२ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या भव्य नेत्र तपासणी, शस्त्रक्रिये शिबीरात ३२५ रुग्णांची तपासणी करण्यात आली ज्यात ५२ रुग्ण हे नेत्र, मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री साई शिक्षण संस्था पाचपिंपळी यांच्या वतीने कै. गंगाबाई पाटील यांच्या पुण्यस्मनार्थ कांग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष तथा संस्थेचे सचिव प्रा. शिवाजी पाटील पाचपिंपळीकर यांच्या पुढाकाराणे कै. गंगाबाई पाटील नर्सींग स्कुल येथे सोमवारी भव्य नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले. यात ३२५ रुग्णाची तपासणी करण्यात आली आहे. ज्यात ५२ रुग्ण नेत्र मोतीबिंदू शस्त्रक्रिया करीता पात्र ठरले आहेत.श्री साई शिक्षण संस्था पाचपिंपळी व नेत्र लायन्स क्लब नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने कै.गंगाबाई रावसाहेब पाटील पाचपिंपळीकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दरवर्षी सातत्याने घेण्यात येत असलेल्या आरोग्य शिबिरात तालुक्यातील गोरगरीब कुटूंबातील शेकडो गजू व्यक्तींना मोठा दिलासा मिळत आहे. अशा सामाजिक उपक्रमा बद्दल तालुक्यातून कौतुक केले जात आहे. यावेळी आनंदराव माली पाटील,काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजी पाटील पाचपिंपळीकर,डॉ. शंकर पाटील, बिलोली पं.स.चे माजी उपसभापती शंकर यंकम, दिलीप पांढरे, सरपंच कमलकिशोर पाटील, विजय जाधव, बिलोली शहराचे नवनिर्वाचित नगरसेवक वलिओद्दीन फारुखी, अमजद चाऊस, संदीप कटारे,शिवाजी, गायकवाड, स्वप्रील खंडेराय, कासराळी ग्रामपंचायतचे सदस्य शिवा पाटील कासराळीकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक पांडुरंग रामपुरे, तिरुपती पाटील हिवराळे,राजू बाबळीकर, सय्याराम निधाने, मोहन जाधव,किशन कमळेकर यांच्यासह अनेक काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# मागील मनपा निवडणुकीत नगरला ३०० कोटींच्या निधीचे आश्वासन

- यंदा 'महाशक्ती' कडून ६००:कोटींची अपेक्षा...

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



येथील महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक लवकरच होणार आहे. यानिमित्ताने महानगरपालिकेतील प्रशासक राज संपुष्टात येऊन पुन्हा एकदा लोकनियुक्त मंडळ कारभार पाहणार आहे. निवडणुकीसाठी राजकीय आघाडीवर सध्या वेट अँड वाच अशी परिस्थिती असली तरी आघाडी, महायुतीची खलबत सुरू आहेत. सुमारे सात वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत भाजप, शिवसेना (एकत्रित), राष्ट्रवादी काँग्रेस (एकत्रित), कॉंग्रेस स्वतंत्र लढले होते. तेव्हा राज्यात आणि केंद्रात भाजपची एकहाती सत्ता असल्याने भाजपने स्वबळावर महानगरपालिका जिंकण्यासाठी जोरदार यंत्रणा उभी केली होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपचे राज्यातील मंत्री, केद्रातील मंत्यांची फोज नगरच्या मैदानात उतरली होती. तेव्हा तत्कालीन केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी एका प्रचारसभेत मनपाची सत्ता मिळाल्यास नगरला ३०० कोटींचा निधी देऊ अशी घोषणा केली होती. या घोषणेची शहरात मोठी चर्चा रंगली होती. मात्र निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. शिवसेनेचे सर्वाधिक नगरसेवक विजयी झाले तर दुसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादी काँग्रेसने यश मिळवले. भाजपला अवघ्या १४ जागांवर समाधान मानावे लागले.

या निवडणुकीनंतर शिवसेना व भाजप सत्तेत एकत्र येईल असे चित्र असताना राष्ट्रवादीने शिवसेनेला रोखण्यासाठी भाजपला पाठिंबा देत मोठी खेळी केली आणि नंतर महापालिकेतील प्रथमच भाजपचा महापौर विराजमान झाला. भाजपला पाठिंबा देण्याच्या निर्णयामुळे आमदार संग्राम जगताप यांना काही काळ पक्ष नेतृत्वाची नाराजी पत्करावी लागली. पण त्यांनी निर्णयावर ठाम राहत महापालिकेवर आपले वर्चस्व निर्माण करून शिवसेनेची कोंडी केली. भाजपचा महापौर झाल्याने महापालिकेला विकास कामांसाठी भरीव निधी मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु ३०० कोटींचे आश्वासन काही पूर्ण झाले नाही.सन २०२९ मध्ये राज्यात राजकीय उलथापालथ होऊन शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस अशी महाविकास आघाडी तयार झाली आणि राज्यात भाजपला सर्वात मोठा पक्ष असूनही विरोधी बाकावर बसावे लागले. याच काळात कोविड महामारी आणि लॉकडाऊन मुळे सर्वच व्यवहार ठप्प झाले.दोन अडीच वर्षांनंतर कोविड महामारी संपली आणि तिकडे शिवसेनेत उभी फूट पडून भाजपने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करीत महाविकास आघाडीला दणका दिला.

या सर्व घडामोडीत महापालिकेत सत्ता असूनही भाजपला शहरासाठी भरीव निधी मिळवता आला नाही.

दरम्यान राष्ट्रवादीतही उभी फूट पडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एक मोठा गट भाजपला जावून मिळाला आणि राज्यातील सत्तेत सहभागी झाला. या घडामोडींचा लाभ घेत आमदार संग्राम जगताप यांनी दोन वर्षांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित यांच्या माध्यमातून नगर मधील रस्ते विकासासाठी तब्बल १५० कोटींचा निधी मिळवला. या निधीतून होणाऱ्या कारणांमुळे नगर मधील अनेक प्रमुख रस्त्याचे भाग्य उजळले आहे.

भाजपकडून ३०० कोटींचे आश्वासन कागदावरच राहिले परंतु आ. जगताप यांनी विशेष प्रयत्न करीत शहराच्या इतिहासात प्रथमच इतका मोठा निधी आणून दाखवला. याच कामांच्या जोरावर आ. जगताप यांनी विधानसभेला सलग तिसऱ्या विजयाची कामगिरी केली.

आता नगरमध्ये अद्याप महायुतीचे ठरले नसले तरी अजितदादांनी राष्ट्रवादी, भाजप आणि शिंदेंची शिवसेना राज्यात सत्तेत आहे. त्यामुळे तीनही पक्षांकडे संसाधनांची कमी नाही. त्यामुळे महापालिकेत एकत्र लढले किंवा स्वतंत्र लढले तरी या तिन्ही पक्षांकडून जाहिरनाम्यात भरीव विकासाचे आणि निधीचे आश्वासन मिळेल हे स्पष्टच आहे. महायुतीतील तीनही पक्ष स्वतंत्र लढले तरी सगळेच सत्तेत आहेत. त्यामुळे मनपा निवडणुकीनंतर पुन्हा त एकत्र आले सत्ता स्थापन केली तर शहराच्या विकासासाठी बदललेल्या परिस्थितीत किमान ६०० कोटीचा निधी मिळाला पाहिजे अशीच नगरकरांची भावना आहे. तसे झाले तर शहराचा खऱ्या अर्थाने कायापालट झालेला पहायला मिळेल.

### तीन शक्तिमान नेत्यांकडून अपेक्षा...

महायुतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे तीनही शक्तिमान नेते आहेत. स्थानिक परिस्थितीनुसार त्यांनी आपापल्या कार्यकर्त्यांना युती अथवा स्वतंत्र लढण्याचा पर्याय दिला आहे. असे असले तरी निवडणुकीनंतर एकत्र येण्याची भूमिकाही त्यांनीक वेळोवेळी मांडली आहे. त्यामुळे उद्या जनतेने तीनही पक्षांना संमिश्र कौल दिला तरी तिघेही एकत्र येऊन सत्ता स्थापन करू शकतात. त्यामुळेच नगरला विकासकामांसाठी किमान ६०० कोटींचा निधी अपेक्षित आहे.

# कुकडी डावा कालवा आवर्तन उद्या सुटणार

■ आमदार काशिनाथ दाते सर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

गुरुवार दि. २५ डिसेंबर २०२५ कुकडी डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी असून उद्या शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी कुकडी डाव्या कालव्यातून आवर्तन सोडण्यात येणार असल्याची माहिती आ. काशिनाथ दाते यांनी दिली. कांद्याच्या दरात झालेली दरवाढ आणि हिवाळी हंगामात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या कांदा लागवडीसाठी वेळेवर पाणी मिळावे, यासाठी पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.



कांदा हंगाम हा पारनेर तालुक्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने, पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. शेतकऱ्यांकडून कुकडी डावा कालवा आवर्तन तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी होत असताना, आमदार दाते सरांनी पुढाकार घेवुन जलसंपदा मंत्री व अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे थेट पाठपुरावा केला.

“शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडवणे हे माझे सर्वोच्च प्राधान्य आहे. कुकडी डावा कालवा आवर्तनासाठी शासन व प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला. आवर्तन वेळेत सुटल्याने पारनेर तालुक्यातील कांदा लागवड सुरक्षित राहील, उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांचा आत्मविश्वास अधिक बळकट होईल.”

**- आमदार काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

या पाठपुराव्याची दखल घेत पालकमंत्र्यांनी कुकडी सिंचन मंडळाच्या अधीक्षक अभियंता श्रीमती अलका अहिरराव व कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर यांच्याशी संपर्क साधत तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. कालवा दुरुस्तीची कामे पूर्णत्वाच्या टप्प्यात असून ती पूर्ण झाल्यानंतर आ. दाते सरांशी संपर्क करुन दि. २६ डिसेंबर रोजी आवर्तन सोडण्याचा निर्णय अंतिम करण्यात आला.

सध्या लाभक्षेत्रात कांदा रोपांची लागवड व वाढीचा अत्यंत महत्त्वाचा कालावधी सुरू आहे. या टप्प्यावर पाणी न मिळाल्यास उत्पादन घट, खर्चवाढ आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता होती.

मात्र आता आवर्तन सुटणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कुकडी डावा कालवा आवर्तन सुटण्याच्या निर्णयामुळे पारनेर तालुक्यातील शेतकरी वर्गाने पालकमंत्री ना. विखे पाटील व आमदार काशिनाथ दाते सर यांचे आभार व्यक्त करत समाधान व्यक्त केले आहे.

# झी टीव्हीवर परतलेली निया शर्मा, “झी रिश्तों का मेला”

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

झी टीव्ही "झी रिश्तों का मेला" या नवीन वर्षाच्या विशेष कार्यक्रमाने २०२६ चे स्वागत करत आहे. ही तीच खास परंपरा आहे जी एकेकाळी झी टीव्हीला उत्सवाच्या काळात घराघरात आवडते बनवत होती. कुटुंब, नातेसंबंध आणि एकत्र साजरे करण्यावर लक्ष केंद्रित करून, हा विशेष उत्सव नवीन वर्षाचे रूपांतर एका सामायिक उत्सवात करतो, जिथे प्रेक्षक त्यांच्या कुटुंबियांसोबत साजरे करू शकतात आणि त्यांच्या आवडत्या स्टार्स, उत्साही कामगिरी आणि हृदयस्पर्शी क्षणांसह नवीन वर्षाचे स्वागत करू शकतात.

सहा वर्षांनंतर झी टीव्हीवर परतणारी निया शर्मा, या भव्य नवीन वर्षाच्या उत्सवात प्रेक्षकांसाठी एक आश्चर्यचकित करणारी असेल. इतक्या वर्षांनी झी टीव्हीच्या मंचावर पाऊल ठेवताना, निया भावनिक झाली आणि "जमाई



राजा" च्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण करून दिली. तिचा अनुभव सांगताना निया म्हणाली, "झी टीव्हीवर परत येणे माझ्यासाठी खूप खास आहे. जेव्हा मी 'जमाई राजा' द्वारे झीमध्ये सामील झालो तेव्हा मी फक्त २३ वर्षांची होते. आज, १३-१४ वर्षांनंतर, आयुष्य पूर्ण वर्तुळात आले आहे आणि जिथे होते तिथे परत आल्यासारखे वाटते. लोक अजूनही मला रोशनी म्हणून ओळखतात आणि या शोने आणि या चॅनेलने मला किती दिले आहे ते दर्शवते."

नियाने तिचे स्वागत केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. झी कुटुंबाचा भाग म्हणून स्वीकारले जाणे आणि संपूर्ण कलाकारांसह जवळजवळ सात मिनिटांचा परफॉर्मन्स सादर करणे हे अत्यंत खास होते. निया पुढे म्हणाली, "कोणत्याही व्यक्तीसाठी आदर ही सर्वात महत्वाची गोष्ट आहे आणि झीने मला ती भावना दिली.

# बँक कर्मचाऱ्यांचे नववे अधिवेशन २७ व २८ डिसेंबर रोजी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशन (एआयबीईए) संलग्नित ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनचे (एआयबीओएमईएफ) दोन दिवसीय नववे अखिल भारतीय अधिवेशन पुण्यात आयोजित करण्यात आले आहे. येत्या शनिवारी (ता. २७) व रविवारी (ता. २८) या दोन दिवशी हे अधिवेशन कॉ. सुरेश धोपेश्वरकर नगरी, दादासाहेब दरोडे सभागृह, बीएमसीसी जवळ, शिवाजीनगर, पुणे होणार आहे. देशभरातील ५०० पेक्षा अधिक बँक कर्मचारी या अधिवेशनात सहभागी होणार आहेत. या अधिवेशनाचे उद्घाटन शनिवारी (ता. २८) सकाळी १०.३० वाजता 'एआयबीईए' चे सरचिटणीस कॉ. सी. एच. वेंकटचलम यांच्या हस्ते, बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निधू



सक्सेना यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. बँक ऑफ इंडियाचे माजी महाव्यवस्थापक व्ही. सी. जोशी, बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स असोसिएशनचे सरचिटणीस कॉ. कृष्णा बरुरकर, 'एआयबीईए' चे उपाध्यक्ष कॉ. एन. शंकर, संयुक्त सरचिटणीस कॉ. ललिता जोशी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनाच्या निमित्ताने दिला जाणारा दुसरा 'कॉ. सुरेश धोपेश्वरकर स्मृती पुरस्कार' यंदा पद्मश्री सुचेता दलाल यांना प्रदान करण्यात येणार आहे. रोख एक लाख रुपये व कार्यगौरव करणारे सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. वित्त क्षेत्रातील त्यांचे मोलाचे योगदान, तसेच बचतदार व गुंतवणूकदारांना पैशांच्या संरक्षणासाठी केलेले मार्गदर्शन व जनजागृती याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात येत आहे. १९९२ मधील हर्षद मेहता घोटाळा उघडकीस आणणाऱ्या त्यांच्या शोध पत्रकारितेमुळे त्या देशभरात परिचित आहेत. अधिवेशनात दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता प्रसिद्ध आयटी तज्ज्ञ व लेखक अच्युत गोडबोले यांचे 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि कामगार वर्ग: संधी, आव्हाने आणि पुढील वाटचाल' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.




दिवा शहरातील ओमकार नगर भागात गटर नाल्यात एक जिवंत अर्भक आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सदर जिवंत अर्भक मुलाचे असून नाल्यात दिसून आल्याने परिसरातील नागरिकांची गर्दी झाली प्रसंगी घटनास्थळी पोलीस प्रशासन व आपत्तीविभागाचे कर्मचारी दाखल झाले होते. पुढील तपास मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलीस करत आहे.. फोटो - संतोष पडवळ )

# हा कार्यक्रम मला ऊब आणि प्रेमाने भरलेला एक मोठा उत्सव वाटला

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

‘झी रिश्तों का मेला’ पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे आणि यावेळी 2026 चे स्वागत भव्य आणि आनंदाने करण्यास झी कुटुंब सज्ज आहे. न्यू यर स्पेशल कार्यक्रमात झी टीव्हीवरील लोकप्रिय पात्रे एकत्र येऊन मनोरंजन, ऊब आणि आनंदाने भरलेली संध्या साकारतील. 31 डिसेंबरला प्रसारित होणारा ‘झी रिश्तों का मेला न्यू यर स्पेशल’ हा कार्यक्रम प्रेक्षकांना मजा, संगीत आणि अविस्मरणीय क्षणांनी भरलेला शानदार उत्सव देण्याचे आश्वासन देतो.

उत्सवाच्या रंगतदार वातावरणात झी टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार – निहारिका चौक्सी, सोनाक्षी बत्रा, शगुन पांडे, आर्या बब्बर आणि इतर अनेक कलाकारांनी आपल्या मालिकेतील भूमिकांपलीकडे



जाऊन रंगमंचावर जोशपूर्ण आणि आकर्षक सादरीकरणे करणार आहेत. झी टीव्हीच्या ‘कुटुंब, भावना आणि एकत्रितपणा’ या मूल्यांना जपणारा हा मेला नवीन वर्षाला एका सामूहिक उत्सवात बदलतो. प्रेक्षकांना आपल्या प्रियजनांसोबत निवांत वेळ घालवण्याचे, आवडत्या कलाकारांच्या मनमोहक सादरीकरणांचा आनंद घेण्याचे आणि हृदयाला स्पर्श करणाऱ्या क्षणांसह नववर्षाचे स्वागत करण्याचे आमंत्रण देतो.

उत्सवाची रंगत आणखी वाढवण्यासाठी श्रद्धा आर्या जय भानुशालीसोबत हा खास कार्यक्रम होस्ट करताना दिसणार आहे. ‘कुंडली भाग्य’ मालिकेत प्रीता या भूमिकेतून घराघरात लोकप्रिय झालेली श्रद्धा आजही प्रेक्षकांच्या मनात खास स्थान राखून आहे. मालिकेचे प्रसारण थांबले असले तरी प्रीता हे पात्र आजही अविस्मरणीय राहिले आहे हेच तिने पुन्हा सिद्ध केले आहे.

खऱ्या आयुष्यात आई असलेली श्रद्धा आर्या अलीकडेच आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्या आणि मातृत्व यांचा समतोल साधण्याबद्दल बोलली. झी टीव्ही कुटुंबाच्या उत्सवी वातावरणाचा आनंद घेताना तिने या प्रवासाबद्दल अनुभव शेअर केला. तसेच तिने ‘कुंडली भाग्य’ मालिकेशी असलेले भावनिक नाते आणि प्रीता या प्रिय पात्राबद्दल मनापासून सांगितले. श्रद्धाने हे पुन्हा अधोरेखित केले की हे पात्र तिच्या आयुष्याचा अविभाज्य भाग राहिले आहे.

आपला अनुभव सांगताना श्रद्धा म्हणाली, “मातृत्व आणि शूटिंग यांचा समतोल साधणे हा माझ्यासाठी शिकण्याचा एक सुंदरप्रवास ठरला आहे. काही दिवस असे येतात जेव्हा हे खूपच आव्हानात्मक वाटते आणि सेटवर असताना मला माझ्या मुलांची खूप आठवण येते. शूटिंग करत असतानाही माझ्या मनाचा एक कोपरा नेहमी त्यांच्या सोबत असतो.पण हे सगळं सार्थक झाल्यासारखे वाटते जेव्हा मी दिवसभराच्या कामानंतर घरी परतते आणि माझी मुले मला घट्ट मिठी मारून माझे स्वागत करतात. त्याक्षणी सगळा थकवा नाहीसा होतो आणि मला आठवण होते की मी दोन्ही जगांचा समतोल का साधते.

# ‘ज्याच्या कपाळी नाही टिळा, त्याला मतदान टाळा’ मोहीम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

हिंदुत्वाशी बेईमानी करून सत्तेच्या लालसेपोटी मुस्लिमांचे लाड करणे थांबवा. हिंदू बांधवांवर, हिंदुत्वावर, गोवंशावर वारंवार हल्ले करणाऱ्या, दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या शक्तींच्या गळ्यात गळे घालून उमेदवारी देण्याचे प्रयत्न दुर्दैवी आहेत. हिंदुत्ववादी पक्ष म्हणवणाऱ्या भारतीय जनता पार्टीतील काही नेतेमंडळी हिंदुत्वाची उपेक्षा करीत आहेत. गुन्हेगारांना उमेदवारी मिळण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. हे असेच चालत राहिले, तर भविष्यात भाजपाचीही अवस्था काँग्रेससारखीच दयनीय होईल. अशा लोकांना पुण्यातील हिंदुत्ववादी समाज जागा दाखवून देईल, असा इशारा हिंदुत्व जागृती सभेत देण्यात आला. दहशतवादमुक्त, शांत व सुरक्षित पुण्यासाठी भाजपाची उमेदवारी यादी मुस्लिममुक्त असायला हवी,




असा आग्रहही या सभेत धरण्यात आला. हिंदुत्ववादी पक्षांनी हिंदुत्वाची उपेक्षा थांबवावी, या मागणीसाठी 'ज्याच्या कपाळी नाही टिळा, त्याला मतदान टाळा' या मोहिमेसाठी हिंदुत्व जागृती सभेचे आयोजन केले होते. समस्त हिंदू आघाडीच्या वतीने शिवाजीनगर येथील मॉडर्न हायस्कुलमध्ये आयोजित सभेला हभप संग्रामबापू भंडारे, क्रांतिकारी देशभक्त समीर कुलकर्णी आणि मिलिंदभाऊ एकबोटे यांनी संबोधित केले. हजारोंच्या संख्येने सकल हिंदू समाजाचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंदूत्ववादी पक्षांकडून अल्पसंख्यांकांच्या तुष्टीकरणाच्या धोरणावर तीनही वक्त्यांनी सडकून टीका केली. मिलिंद एकबोटे म्हणाले, "पुण्यात भगव्याची, हिंदुत्वाची उपेक्षा सुरु आहे. भाजपचे नेते गुंडाना पोसण्याचे काम करत आहेत. हिंदू बांधवांवर हल्ले करणाऱ्या मुस्लिमांना उमेदवारी मिळण्यासाठी आग्रह करीत आहेत. हे चित्र अतिशय दुर्दैवी असून, धर्मासाठी, देशासाठी व पक्षासाठी आयुष्य खर्ची घालणाऱ्या प्रामाणिक नेत्यांवर अन्याय होत आहे. या देशाच्या, धर्माच्या रक्षणासाठी शामाप्रसाद मुखर्जी, दीनदयाळ उपाध्याय यांच्यासह अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी यांचा त्याग आहे. मात्र, आज हिंदूंकडूनच मुस्लिमांचे लांगुलचालन सुरु आहे. एवढेच नाही, तर या विशिष्ट राजकीय धोरणामुळे पुण्यातील सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत आहे. दिल्लीतील कार स्फोटाचे संबंध कोंढव्यातील अतिरेक्यांपर्यंत पोहचतात आणि कोंढव्यातील अतिरेकी प्रवृत्तीचा विस्तार शहरभर झाला आहे, ही गंभीर बाब आहे."

"गेल्या अनेक वर्षात भाजपने कमावलेली पुण्याई वाया घालवण्याचे काम स्थानिक शीर्ष नेतृत्व करीत आहे. हज हाऊस बांधण्यासाठी आग्रही असणारेच आज पुन्हा मुस्लिमाना उमेदवारी देण्यात आघाडीवर आहेत. आज हिंदुत्वाच्या जीवावर मंत्रीपद, आमदारकी मिळवणाऱ्या याच लोकांनी आणलेला हज हाऊसचा प्रयत्न हाणून पाडला.

# लेक्सस इंडिया ने आपल्या एलएम ३५०एच ची वाढ नोंदवत राखली वाढीची गती

**पुणे : (समर्थ गांवकरी)**


लेक्सस इंडिया तर्फे आज त्यांच्या महत्त्वपूर्ण एमपीव्ही उत्पादन असलेल्या एलएम ३५० एच या उत्पादनाची उत्तम कार्यक्षमता नोंदवली असून नोव्हेंबर २०२५ च्या तुलनेत ४० टक्के वाढ तर जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान एकंदरीत १५ टक्के वाढ ही गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत नोंदवली आहे. एलएम ३५०एच ही गाडी सातत्याने अल्ट्रा लक्झरी मोबिलिटी क्षेत्रातील अनोखी गाडी ठरली असून यामुळे पाहुण्यांना योग्य डिझाईन सह अधिक आराम आणि सोपेपणा प्राप्त झाला आहे.

# लाइटस्टाईल बाय पीएनजी ज्वेलर्सचे नवे स्वतंत्र दालन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

हाऊस ऑफ पीएनजीच्या कंटेम्प्ररी लाईफस्टाईल ब्रँड “लाइटस्टाईल बाइ पीएनजी” ने पुण्यातील विमाननगर येथील आयडियल लँडमार्क कॉम्प्लेक्समध्ये आपल्या नवीन स्वतंत्र दालनाचे उद्घाटन केले आहे. पुण्यातील अत्यंत गजबजलेल्या आणि विकसनशील परिसरात असलेले हे दालन हलकी, स्टायलिश आणि ठळक डिझाईन असलेल्या दागिन्यांची पसंती असलेल्या आजच्या फॅशनप्रेमी ग्राहकांसाठी खास सुरू करण्यात आले आहे.

६०० चौ. फूट क्षेत्रफळ असलेले हे विमाननगर मधील दालन पुण्यातील लाइटस्टाईलचे चौथे तर एकूण भारतभर पाचवे स्टोअर असून, यामुळे पीएनजी ज्वेलर्सच्या विविध फॉरमॅट्समधील स्टोअर्सची एकूण संख्या ६६ वर पोहोचली



आहे. या स्टोअरचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेत्री सई ताम्हणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्टोअरमध्ये १४ कॅरेट, १८ कॅरेट आणि २२ कॅरेट सोन्यातील दागिन्यांसह १८ कॅरेट डायमंड ज्वेलरीचा विस्तृत संग्रह उपलब्ध आहे. समकालीन डिझाईन, परवडणारी किंमत आणि प्रीमियम रिटेल अनुभव यांवर लक्ष केंद्रित करत, लाइटस्टाईल ब्रँड शहरी ग्राहकांमध्ये आपली वेगळी ओळख अधिक मजबूत करत आहे.

उद्घाटनप्रसंगी अभिनेत्री सई ताम्हणकर म्हणाल्या, “आजच्या महिलांचा आत्मविश्वास, बहुआयामी व्यक्तिमत्त्व आणि सहजतेने वापरता येणारी स्टायलिश ज्वेलरी लाइटस्टाईलच्या डिझाईन्समधून सुंदररीत्या दिसून येते. हे दागिने रोजच्या वापरासाठी आणि आजच्या महिलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी परिपूर्ण आहेत.”

# अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये आज दि.२५ डिसेंबर, २०२५ रोजी अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, शिवाजी हुंडे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# जामखेड ग्रामिण रुग्णालयाचा कारभार चव्हाट्यावर

- अधिक्षकांनी घेतली बदली करुन
- जामखेड ग्रामीण रुग्णालयातील प्रशासकीय शिस्त आणि रुग्णसेवा कंत्राटी कर्मचाऱ्यांची मनमानी
- आरोग्य वर्तुळात खळबळ

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड ग्रामीण रुग्णालयातील प्रशासकीय शिस्त आणि रुग्णसेवा कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कथित मनमानीमुळे धोक्यात आली आहे. येथील मुजोर कंत्राटी कर्मचारी आणि काही अधिपरिचारिकांच्या सततच्या हस्तक्षेपामुळे वैतागून कर्तव्यदक्ष वैद्यकीय अधीक्षक डॉ.रामदास




मोरळे यांनी अखेर आपली बदली करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याला कर्मचाऱ्यांच्या दबावामुळे पद सोडावे लागल्याने आरोग्य विभागाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या विश्वसनीय माहितीनुसार, रुग्णालयातील काही कंत्राटी कर्मचाऱ्यांनी समांतर प्रशासन चालवण्याचा प्रयत्न सुरू केला होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लेखी व तोंडी आदेशांची जाणीवपूर्वक पायमल्ली करणे, रुग्णालयातील अंतर्गत गोपनीय माहिती बाहेर पुरवणे आणि कर्मचाऱ्यांमध्ये गटबाजी निर्माण करून प्रशासकीय कामात अडथळे आणण्याचे प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होते. कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून डॉ.मोरळे यांनी रुग्णालयाचा दर्जा सुधारण्यासाठी घेतलेल्या निर्णयांना या 'लॉबी' कडून सातत्याने विरोध केला जात होता.

डॉ.मोरळे यांनी या गंभीर बाबींकडे राज्याचे विधान परिषदेचे माननीय सभापती राम शिंदे, विधान सभेचे आमदार रोहित दादा पवार तसेच जिल्हा शल्य चिकित्सक आणि वरिष्ठ प्रशासनाचे लक्ष वेधले होते. वेळोवेळी लेखी अहवाल सादर करूनही संबंधितांवर कोणतीही शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात आली नाही. जेव्हा एखादा जबाबदार अधिकारी व्यवस्थेतील त्रुटी सुधारण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याला संरक्षण देण्याऐवजी प्रशासनाने दाखवलेल्या उदासीनतेमुळे डॉ.मोरळे यांचा भ्रमनिरास झाला. अखेर मानसिक क्लेश आणि कामातील वाढता हस्तक्षेप नको म्हणून त्यांनी स्वेच्छेने बदलीचा पर्याय स्वीकारल्याचे बोलले जात आहे.

"जर वर्ग-१ च्या दर्जाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याला कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या दबावामुळे बदली घ्यावी लागत असेल,तर हे स्थानिक प्रशासनाचे मोठे अपयश आहे. ही केवळ एका अधिकाऱ्याची बदली नसून प्रामाणिक रुग्णसेवेचा झालेला पराभव आहे.

(योगेश अब्दुले सामाजिक कार्यकर्ते")

एकीकडे सरकार ग्रामीण आरोग्य सेवा बळकट करण्याचे दावे करत असताना, दुसरीकडे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या 'दादागिरी' मुळे अनुभवी अधिकारी रुग्णालय सोडून जात आहेत. यामुळे सामान्य रुग्णांचे प्रचंड हाल होत असून रुग्णालयातील शिस्त पूर्णपणे कोलमडली आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. प्रशासकीय नियंत्रणाचा अभाव:-कंत्राटी कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांचा धाक उरला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. दोषींना पाठीशी घालणारे कोण?:-अनेक तक्रारी होऊनही कारवाई न होण्यामागे नेमके कोणाचे राजकीय किंवा प्रशासकीय वरदहस्त आहेत? रुग्णसेवेवर परिणाम:-अंतर्गत वादामुळे सर्वसामान्यांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांवर विपरीत परिणाम होत आहे.